शासन निर्णय दि.३१/३/२००६ मधील परिच्छेद ब(१)(३) नुसार घनकचरा व्यवस्थापनांतर्गत घनकचरा गोळा करून त्याचे विलगीकरण व परिवहन करणे ही कामे अनुज्ञेय आहेत.

परंतु नगरपरिषदेने विलगीकरण व कचरा प्रक्रिया करण्याबाबत कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षणांस पूर्तता करावी.

३) १२ वा वित्त आयोग अनुदान वाटप आदेशांत नमूद केल्याप्रमाणे वितरीत केलेल्या अनुदानाच्या ५६.५०% घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करणे बंधनकारक असून उर्वरीत४३.५०% इतर विकास कामे/ देखभाल दुरुसती कामावर खर्च करणे बंधनकारक आहे. तसेच दोन्ही कामाकरीता अनुदान जमा करण्याकरीता राष्ट्रीयकृत बँकेत दोन स्वतंत्र खाती असणे आवश्यक आहे.

याबाबत संबंधित दोन्ही खात्यांवर किती टक्के रक्कमा जमा व खर्च झाल्या, त्याकरीता ठेवलेले स्वतंत्र नोंदवह्या अभिलेखे व योग्य ती कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षणांत पुर्तता करावी.

उपरोक्त मुद्दा क्र. १ ते ३ ची पुर्तता करून लेखापरीक्षणांस दर्शवावी.

**परिच्छेद क्र. ८ – न. पा. साताराकडील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक वेतनश्रेणीबाबत.**

अध्यक्ष, सातारा न. प. यांचे पत्र क्र. १५६ दि. १/५/९१ अन्वये न. प. कर्मचाऱ्यांना चौथा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्ताव न. प. प्रशासन, संचालनालयास पाठविणेत आला होता. सातारा न. पा. ठ. क्र. ३७ दि.२९/५/९१ अन्वये प्रस्तावित केलेनुसार काही पदांना न. पा. प्रशासन संचालनालया कडील आदेश क्र. एमसीपी–२२९१/प्र.क्र.१३८/९५/५ दि. २/१/९६ व एमसीपी २२९१/प्र.क्र.१२४/९१/१ दि.२३/४/९२ नुसार ४ थ्या वेतन आयोगातील वेतन श्रेणी ऐवजी वैयक्तिक वेतन श्रेणी मंजूर करणेत आली. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचे आदेश क्र. साशा/नपा/४३२ दि.२०/१/०१ नुसार पाचवा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी मंजूर करणेत आली. परंतु मा. संचालक यांचेकडील पत्र

क्र.नप्रस/वेश्रे १०२०/प्र.क्र.६४/२००७/७ दि. ३१/१०/२००० नुसार वैयक्तिक वेतनश्रेण्या देऊ नयेत असे आदेश असल्याने वैयक्तिक वेतन श्रेण्यांचा विचार न करता चौथ्या वेतन आयोगाच्या मंजूर वेतन श्रेणीनुसार त्या पदापुढे नमूद केल्याप्रमाणे ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या चालु करताना ग्राह्य धराव्यात असे मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशात नमुद करण्यात आले.

तद्नंतर मा. उप लोक आयुक्त यांनी त्यांचेकडील अ. शा. पत्र क्र. उलोआ/कॉम/२५३४/९८ (क. अ. १) दि. १९/७/०१ ने वैयक्तिक वेतनश्रेणी संबंधातील प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्याबाबत संचालनालयास निर्देशित केल्याने परिशिष्ट क्र. १ मधे नमुद केलेप्रमाणे आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे त्या त्या पदांकरीता निर्गमित केलेल्या दि. २९/१२/०५ चे आदेशान्वये त्या पदांची वैयक्तिक वेतनश्रेणी रद्द करण्यात आली. तसेच वैयक्तिक वेतनश्रेणी म्हणून जी अधिकची रक्कम अदा करण्यात आली आहे ती, महाराष्ट्र न. प. नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९६ व महा. न. प. लेखा संहिता नियम १९७१ चे नियम १२६ के मधील तरतुदींनुसार वसूल करण्यात यावी व त्याचप्रमाणे वैयक्तिक वेतनश्रेणीमध्ये जे अधिक वेतनअदा करण्यात आल्यामुळे न. प. ला शासनाकडून प्राप्त झालेले जादाचे महागाई भत्ता अनुदान शासकिय कोषागारात जमा करण्यात यावे असे सदर आदेशात नमुद करण्यात आले आहे. संबंधित पदाच्या कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके पडताळली असता दि. १/१/८६ पासून ४ थ्या वेतन आयोगाच्या मंजूर वेतनश्रेणी व तद्नंतर ५ व्या वेतन आयोगाच्या मंजूर वेतनश्रेणीनुसार सुधारित पुनर्वेतननिश्चिती करण्यात आल्याचे सेवा पुस्तकांवरून दिसते. तसेच जादा अदा रक्कमांची वसुली केवळ सन १०/११ मध्ये निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे उपदाना इ. मधून करणेत आली आहे. परंतु उर्वरित कर्मचाऱ्यांचे बाबत सदर कार्यवाहीकेल्याचे निदर्शनास आले नाही. तरी शासन आदेश दि. २९/१२/०५ नुसार ज्यादा आदा रक्कमेची संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसुली करणेच कार्यवाही होणे तसेच शासनाकडून जादा प्राप्त महागाई भत्ता अनुदान शासना परत करणेची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी शासन आदेशानुसार कार्यवाही करून पूर्तता दाखवावी.

परि. क्र. २

**परिच्छेद क्र. ९ - भविष्य निर्वाह निधीमधील गुंतवणुकीबाबत.**

लेखापरीक्षण कालावधीत भ. नि. नि. कॅशबुक, पासबुक व गुंतवणूक रजिस्टर नमुना १४२ ची तपासणी केली असता एकूण भ. नि. नि. गुंतवणूक रु.५८,६५,८५७/- ची करण्यात आलीअसून त्यांची लेखापरीक्षण कालावधीत पुर्नगुंतवणूक रु.३६,७१,८५७/- व नवीन गुंतवणूक रु.५,००,०००/- अशी एकूण रु.४१,७१,८५७/- करण्यात आली आहे.

मात्र गुंतवणूक व पुर्नगुंतवणूक केलेल्या जमा / खर्चाच्या नोंदी भ. नि. नि. कॅश बुकमध्ये करणे आवश्यक असता सदरच्या नोंदी करण्यात आल्या नाहीत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम ३२(२) अन्वये रोजच्या रोज जमा / खर्चाच्या नोंदीचे व्यवहार रोकडवहीमध्ये नोंदविणे आवश्यक असता सदर केलेल्या गुंतवणूक व पुर्नगुंतवणूकीच्या जमा / खर्चाची नोंद कॅशबुक नमुना ११ मध्ये न घेता परस्पर निधीबाहेर गुंतवणूक करण्यात आली असल्याचे दिसून येते. निधीबाहेर व्यवहार ठेवून गुंतवणूक असल्याने त्यामध्ये गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी रोकडवहीमध्ये सदर गुंतवणूकीच्या नोंदी का घेण्यात आल्या नाहीत याचा खुलासा करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. १० - अंध, अपंग कल्याणकारी योजनेवर खर्च न केलेबाबत.**

न. प. सातारा ने आर्थिक वर्ष १०-११ मध्ये अंध, अपंग कल्याणकारी योजनांवर खर्च केलेला नाही. त्याबाबत आक्षेप खालीलप्रमाणे -

१) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१०/प्र.क्र.१४६/२०१०/न. वि. ६ दि. ३० आक्टोबर १० नुसार मागील वर्षाच्या महसुली उत्पन्नावर ३% खर्च करणे बंधनकारक आहे. सन ०९-१० चे महसुली उत्पन्न रु.५,५५,९३,५७६/- वर ३% प्रमाणे रु.१६,६७,८०७/- खर्च होणे आवश्यक होते.

२) अंदाजपत्रक पान नं. १०८ वर अनुक्रमांक १२ ला सदर बाबींवर खर्च करणेसाठी रु.१२,००,००० तरतुद केलेली असताना सदर बाबीवर खर्च केलेला नाही.

३) शासनाचे आदेश असताना, अंदाजपत्रकात तरतुद असताना अंध, अपंग कल्याणकारी योजनेवर खर्च करण्यात आला नाही. सदर घटकास लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. याबाबत लेखापरीक्षणांस सकारण पुर्तता दर्शवावी.

**परिच्छेद क्र. ११ – वॉर्ड क्र. ३३ पेठ शनिवार आत्तार बिल्डींग पिछाडी ओढ्यास संरक्षक भिंत बांधणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१,८०,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | - |
| तांत्रिक मान्यता | : | चिशा/तांम/जा.क्र.६९५/१० दि. १५/३/१० |
| मक्तेदाराचे नांव | : | श्री. सुजित व्यंकटराव भोसले |
| कामाचे आदेश | : | जा. क्र./सानप/साबां/८५४ दि. १/२/१० |
| कामाची मुदत | : | ३० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | ४२ पान क्र.९८-९९ |
| लेखाशिर्ष | : | अल्पसंख्यांक |
| करारपत्र | : | ६००/- दि.२९/१/१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.८७७२ सेलटॅक्स (कार्यकंत्राट कर) ७०१८ |
| | | आयकर रु.३५०९ विमा - रॉयल्टी ६३८ |
| झालेला खर्च | : | प्र.क्र. दिनांक रक्कम |
| | | २७३ ५/६/१० १,७५,४३९/- |

उपरोक्मत प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) मा. जिल्हाधिकारी सातारा यांनी सदर कामांस प्रशासकीय मान्यता दिल्याबाबतचा आदेश सोबत जोडला नाही. तसेच तांत्रिक मान्यतेपुर्वी वर्क ऑर्डर कशी काय दिली याबाबत खुलासा करावा.

२) मोजमाप पुस्तक क्र. ४२ पान क्र. ९८/९९ वर कामाचे नाव पेठ शनिवार आत्तार बिल्डींग गटर काम केले. परंतु प्रत्यक्ष मोजमाप हे संरक्षक भिंत बांधणेचे आहे. विसंगतीबाबत खुलासा करावा.

३) शासन निर्णय क्रमांक अविवि-२००९/प्र.क्र.४३/०९/का.१ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ?/२/२००९ अन्वये अल्पसंख्यांक बहुत क्षेत्रात मूलभूत नागरी सोयी सुविधांसाठी अनुदानातून शासन निर्णय बाब क्र. २ मध्ये कामे नमूद केली आहेत. ती कामे घेणे आवश्यक आहे तसे न करता संरक्षक भिंत बांधणे हे हाती घेतले आहे. शासन आदेशानुसार काम हाती घेतले नसल्याने त्या संरक्षण भिंत बांधकाम या कामाचा खर्च ले. प. मान्य करता येत नाही.

४) काम पूर्ण झाल्याबाबतच्या प्रमाणपत्रावर न. नं. १३३ यावर मुख्याधिकारी, सातारा यांची स्वाक्षरी नाही. तरी स्वाक्षरी घेऊन पुर्तता दाखवावी.

वरील आक्षेपाच्या पुर्तते अभावी सदर कामावर झालेला खर्च र. रुपये १,७५,४३९/- लेखा परीक्षणात तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. १२ - वाहन देखभाल दुरुस्तीवरील नियमबाह्य खर्चाबाबत.**

न. प. साताराकडील वाहन क्र. एम. एच. ११, ए. बी. १००१ (टाटा इंडिगो पेट्रोल) व वाहन क्र. एम. एच. ११ ए. बी. १००० (टाटा इंडिगो पेट्रोल) या वाहनांचे लॉगबुक व इतिहास नोंदवहीची तपासणी केली असता त्यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) न. प. संचालनालय स्थायी निदेश क्र. ३२ मधील १६ नुसार वाहनाच्या देखभाल दुरुस्तीसाठी व वाहन सुस्थितीत ठेवण्याकरीता पेट्रोल वाहनांकरीता प्रतिवर्ष रु.२५,०००/- खर्च करण्याची मर्यादा आहे. न. प. ने पेट्रोल वाहनाकरीता खालीलप्रमाणे जादा खर्च केलेला आहे.

| वाहन क्रमांक | सन १०-११ मध्ये केलेला एकूण खर्च | खर्चाची मर्यादा | जादा खर्च |
|---|---|---|---|
| एमएच-११ एबी १००१ | ३७,४१८=०० | २५,०००=०० | १२,४१८=०० |
| एमएच-११ एबी १००० | ४२,५५८=०० | २५,०००=०० | १७,५५८=०० |
| | | एकूण जादा खर्च | २९,८७६=०० |

करीता स्थायी निर्देश अ. क्र. ०७ (अ) नुसार विहित मर्यादेपेक्षा अधिक झालेल्या प्रस्तावास विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांची मान्यता घेणे आवश्यक असताना याबाबत कार्यवाही घेतल्याचे दिसत नाही.

ब) तसेच स्थायी निर्देश क्र. ३२ अ. क्र. १८ नुसार जिल्ह्याबाहेरील दौऱ्यासाठी वाहन वापरण्यात येऊ नये असे आदेश आहेत. याबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

उपरोक्त (अ) व (ब) बाबत अनुपालन सादर करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. १३ - किमान रोख शिल्लक ठेवणेबाबत.**

म. न. प. लेखा संहिता १९७१ मधील नियम २७ प्रमाणे वित्तीय वर्षाच्या शेवटी खालीलप्रमाणे किमान रोख रक्कम शिल्लक ठेवली पाहिजे. त्यानुसार रुपये ५ लाखाच्या पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या नगरपरिषदेसाठी रुपये ३०,०००/- अथवा मागील वित्तीय वर्षावरील उत्पन्नाच्या ४% यापैकी जी कमी असेल ती रक्कम रोख स्वरूपात शिल्लक ठेवली पाहिजे. न. पा. कडे किमान शिल्लक याचा अर्थ, सर्वसामान्य हेतूसाठी विनियोग न करता येणाऱ्या सर्व संवैधानिक निधीमधील शिल्लकी, ठेवी, अनुदाने व विनिर्दिष्ट उद्दीष्टांसाठीची कर्जे यामधील अखर्चित शिल्लकी, चिन्हांकित/पृथक रक्षीत निधीच्या शिल्लकी इत्यादी वगळून नगरपरिषदेकडे उरणारी मुक्तता/अनिर्बंध शिल्लक हा आहे. त्याचप्रमाणे या नियमात उल्लेख केलले उत्पन्न यामध्ये विशिष्ट उद्दीष्टांसाठी मिळालेल्या अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासनाकडून मिळालेल्या इतर अनुदानाच्या जमेचा समावेश असावा असा उल्लेख आहे.

**परिच्छेद क्र. १४ - पाणी पुरवठा योजना तोट्यात असलेबाबत.**

नगरपरिषद साताराचे पाणी पुरवठा विभागाचे जमाखर्च पत्रक सन २०१०-११ पहाता (परिशिष्ट क्र. ... ) त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) दि. ३१/३/२०११ अखेर पाणी पुरवठा विभागाचे उत्पन्न रु.१,८८,७८,३३२/- आहे. खर्च रु.२,१२,८८,४८९/- एवढा आहे. त्याप्रमाणे न. प. स तोटा रु.२४,१०,१५७/- इतका झाला आहे. सदर तोटा कमी करण्यासाठी पाणी वापराचे सुयोग्य नियोजन, पाणी गळती कमी करणे, आस्थापनेवरील खर्चावर नियंत्रण इत्यादी बाबींची दक्षता घेतल्यास झालेला तोटा कमी करता येईल.

२) नगरपरिषद आपल्या वेगवेगळ्या उद्‌भवातून अशुद्ध पाणी उचल करते. हे पाणी शुद्धीकरणानंतर वितरीत करण्यात येते. तथापी जमा होणारे अशुद्ध पाणी व वितरीत होणारे शुद्ध पाणी यांचा मेळ घेतला जात नाही. तशी दैनंदिनी नोंदवही ठेवलेली नाही. उचल व वितरण यामध्ये तफावत राहू नये याची दक्षता घेणे आवश्यक वाटते.

३) नगरपरिषद क्षेत्रात एकूण २८,९१८ इतके करपात्र मिळकतधारक आहेत. त्यापैकी ६,४८३ करदात्यांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाणी उपलब्ध आहे. उर्वरीत २२,४३५ मालमत्ता धारकांपैकी फक्त १२,६४० इतकेच मिळकतदार नळ कनेक्शन धारक आहेत. उर्वरीत ९,७९५ मालमत्ता धारक नळ जोडणी विना पाणी वापर करतात, असे दिसते. सदर मिळकत धारकांना पाणीपट्टीच्या कक्षेत आणणे आवश्यक वाटते. त्याशिवाय अवैध नळ जोडणी, विज पंपाद्वारे नळाच्या तोटीतून पाणी खेचून घेणे इ. बाबींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

४) वर्ष २०१०-११ मध्ये पाणी करापोटी मागणी रुपये ३,१९,५५,८५५/- एवढी होती. त्यापैकी रुपये १,८४,४९,६७३/- वसुली झाली. वर्षाअंती रुपये १,३३,६५,३८३/- इतकी थकबाकी येणे आहे. वसुलीची टक्केवारी ५८% इतकीच आहे. सदर बाब गंभीर असून पाणी पुरवठा योजनेच्या तोटा पाहता १००% पाणीपट्टी वसूल होणे आवश्यक वाटते.

५) अशुद्ध पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया राबविताना कोणत्या रसायनांचे शास्त्रशुद्ध प्रमाण काय आहे? याची माहिती असलेला प्रशिक्षित कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे आवश्यक आहे. अशा कर्मचाऱ्यांना जलशुद्धीकरणाबाबत प्रशिक्षण दिल्याचे दिसून येत नाही.

६) लेखापरीक्षण कालावधीमध्ये वर्ष २०१०-११ साठी रुपये १,७७,५००/- इतकी रक्कम पाणी पुरवठा डिपॉझीट पोटी जमा झाली आहे. सदर रक्कम व यापूर्वी वर्ष २००९-१० अखेर जमा झालेली डिपॉझीटची रक्कम परिगणित करण्यात येवून ती एकत्रितपणे गुंतवणूक होणे आवश्यक वाटते.

वरीलप्रमाणे मुद्दा क्र. १ ते ६ बाबत दक्षता घेण्यात येवून न. पा. चा तोटा कमी होईल, अशी उपाययोजना होणे आवश्यक वाटते.

## मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे

## कलम ९(ब) खालील आक्षेप

**परिच्छेद क्र. १५ :- प्रलंबीत तसलमात रक्कम वसुलीबाबत.** /

सातारा नगरपालिकेकडील सन २०१०-११ ची तसलमात नोंदवही पडताळणी केली असता खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

१) न. पा. ने विविध कारणांसाठी कर्मचाऱ्यांना तसलमात रक्कमा दिल्या आहेत. सदर रक्कमा वर्ष अखेरीस खर्च वजा जाता उर्वरीत रक्कम समायोजीत करणे आवश्यक आहे. तथापी अहवालातील विवरण पत्र क्र. ... मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील तपशिलाप्रमणे सन १९५१ पासून तसलमात रक्कम समायोजना अभावी प्रलंबित आहे. दि. ३१/३/२०११ अखेर रक्कम रुपये २९,१३,३२२/- एवढी विविध कर्मचाऱ्यांकडून येणे बाकी आहे. विवरण पत्र क्र. .. नुसार सदर थकबाकीदार कर्मचारी आता सेवानिवृत्त / मयत झाले असण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत न. पा. चे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

२) न. पा. प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. ३५ मधील अ. क्र. १५ अन्वये प्रलंबीत अग्रीम समायोजनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. संबंधीत खातेप्रमुखांवर तसेच जबाबदार कर्मचाऱ्यांवर लेखी जबाबदारी सोपवावी. त्यानुसार थकबाकीदारांना रक्कमेच्या समायोजनासाठी कमाल ६० दिवसांची मुदत द्यावी. मुदतीत समायोजन न झाल्यास ही रक्कम न. पा. अधिनियम १९६५ चे कलम ९६ नुसार न. पा. ची आर्थिक हानी समजण्यात यावी. त्यानुसार सक्तीच्या उपाययोजना अंमलात आणाव्यात. संबंधीतांना उक्त अधिनियमाचे कलम १५०, १५१ व १५२ अन्वये अनुक्रमे मागणीचे बील द्यावे, नोटीस द्यावी. तरीही रक्कम वसूल न झाल्यास अधिपत्र बजावून वसुली करण्यात यावी.

३) स्थायी निर्देश अ. क्र. ३५/१७ अन्वये वरीलप्रमाणे रक्कम वसुलात न आल्यास १५ दिवसांत रक्कम वसूल न झाल्यास १२% चक्रवाढ व्याजाची आकारणी करण्यात यावी. ज्या कर्मचाऱ्यांवर ही वसुलीची जबाबदारी सोपविण्यात येईल त्यांनी वरीलप्रमाणे वसुलीची कार्यवाही न केल्यास सदर प्रलंबीत रक्कम वसुली कर्मचाऱ्याच्या वेतनातून वसूल करण्यात यावी. सदर समायोजनासाठी त्या त्या खातेप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करावी. समायोजन न होणाऱ्या रक्कमेची वसुली वेतनातून/सक्तीच्या मार्गाने करण्यात यावी.

स्थायी निर्देश ३५/१८ अन्वये

अ) स्थायी अग्रीम अखर्चीत रक्कमा रोखपालांकडे वेळोवेळी जमा असल्याची खातरजमा कारी / लेखापाल / हिशेब तपासनीस यांनी करावी.

ब) जे कर्मचारी अग्रीम रक्कमेचे समायोजन मुदतीत पूर्ण करणार नाही, त्यांचे वेतनातून या ची वसुली करावी व अशा कर्मचाऱ्यांना अग्रीम देणे बंद करावे.

क) अग्रीम रक्कम समायोजनाकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी व कर्मचारी शिस्तभंग कारवाईस हतील.

स्थायी निर्देश ३५/१९ अन्वये वरीलप्रमाणे कार्यवाही काटेकोरपणे करण्यात यावी. त्यास्तव धिकारी स्वत: कार्यवाहीस पात्र राहतील.

वरीलप्रमाणे कार्यवाही होणे अत्यंत आवश्यक आहे. वरीलप्रमाणे रक्कम रु.२९,१३,३२२/- त आणावी. पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**च्छेद क्र. १६ :- पेठ भवानी सि. स. नं. ७ पैकी आ. क्र. ९ मधील भाजीपाला व फळविक्री केंद्र बांधणे.**

**नावि - ६ अनुदान रु.२०.७५ लक्ष कर्ज रु.३०.०० लक्ष एकूण ५०.७५ लक्ष.**

| | | |
|---|---|---|
| पत्रक | : | रु.५८,१९,८१५/- सुधारीत रु.६१,७६,०७७/- |
| कीय मान्यता | : | जिल्हा नियोजन समिती ८५७/९.२.१० |
| | | स्थायी समिती ठराव क्र. ८३४ दिनांक १/१२/०९ |
| क मान्यता | : | का. अ. मजिप्रा, सातारा यांचे जा. क्र. ३२६ दि. ३०/१/१० |
| र | : | महेंद्र कन्स्ट्रक्शन, वरकुटे मलवडी ४.९८% अधिक्य |
| भ आदेश | : | जा. क्र. सानप/सांबां./२०८/ दि. २४/५/१० |
| ची मुदत | : | २७० दिवस काम सुरू. कामाची मुदतवाढ दि. १२/११/१० अखेर |
| पुस्तक | : | क्र. ५२ पान क्र. ३ ते ५ |

लेखाशिर्ष : नावि-६

करारपत्र : रु.१५,१०० दि. २४/५/१०

झालेला खर्च :

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ११२८ | ७/१०/१० | १२,९२,५५०.०० | प्रथम देयक |
| १४१२ | १५/११/१० | १२,०१,३३५.०० | दुसरे देयक |
| १७५५ | १/१/११ | ६,७२,४८४.०० | तिसरे देयक |
| २२६० | ११/३/११ | ८,६४,९८४.०० | चौथे देयक |
| | | ४०,३१,३५३.०० | |
| ११७० | १४/१०/१० | ८४,७६९.०० | आर्किटेक्ट फी |
| २३०७ | १७/३/११ | ९१,०५५.०० | तां. मान्यता फी. |
| | एकूण | ४२,०७,१७७.०० | |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर कामाची जाहीर निविदा नोटीस दैनिक पुढारी दि. २४/३/१० मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून त्याची मुदत दिनांक ३/४/१० अखेर दुपारी ४ वाजेपर्यंत होती. तथापी महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार शासन निर्णय क्र. भांखस-१०८८/२५१२ दि. २/१/९२ कलम ८.३ अ प्रमाणे निविदेस कमीत कमी ३ आठवड्यांची मुदत देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे नस्तीस अल्प कालावधीची निविदा प्रसिदद्ध करण्याबाबत कारणे नमूद केलेली कागदपत्रे दिसून येत नाहीत.

२) सदर कामाच्या निविदा सुचनेमध्ये अंदाजपत्रकीय रक्कमेप्रमाणेच मक्तेदारास वर्क ऑर्डर देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. निविदा सूचना व वर्क ऑर्डर मधील अंदाजपत्रकीय रक्कमेत विसंगती आहे.

३) मोजमाप पुस्तक क्र. ५२ पान क्र. १५, १८ बाब क्र. ११ दुसरे/तिसरे रनिंग बिलामधून मटेरियल ॲट साईट या आधारे ॲडव्हान्स पेमेंट मक्तेदाराला खालीलप्रमाणे अदा करण्यात आले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट | २.५ एम. टी. | रु. ६४,०५६.८५ |
| २. | वरील प्रमाणे | ३.१६ एम. टी. | |
| ३. | वरील प्रमाणे | ५.०० एम. टी. | |
| | | १०.६६एम. टी. | |
| (-) | ॲडव्हान्स रक्कम कपात | ५.०० एम. टी. | |
| | कपात करणे आवश्यक | ५.६६ एम.टी. | |

मटेरियल ॲट साईट - या आधारे ॲडव्हान्स पेमेंट मागणी करण्याबाबतचे मक्तेदाराचा अर्ज [illegible] नाही. तसेच स्टीलचे डिटेल मोजमापे घेण्यात आले नाही. त्याचप्रमाणे सदर साहित्य कामाच्या [illegible]णी आणले असल्याबाबतचे प्रमाणपत्र दप्तरी नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता [illegible]१ मध्ये आगाऊ रक्कमा अदा करण्याबाबत तरतूद नाही. परंतु त्यातील नियम क्र. १८५ अन्वये [illegible]क्य सार्वजनिक बांधकाम विभागाची नियमपुस्तिका व्यवहार्य असेल तेथे वापरता येईल. त्या [illegible]वे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता नियम क्र.१०.२.२१ अन्वये कामाच्या जागेवर [illegible]लेल्या साहित्याच्या प्रतिभूतीवर अशा सामानाच्या मूल्याच्या ७५% रक्कम मंजूर करता येते. मात्र [illegible] प्रकरणी १०० टक्के रक्कम अदा केली आहे. तरी १००% आगाऊ रक्कम कशी व काय आधारे [illegible] केली. या नियमबाह्यतेबाबत खुलासा करून जादा अदा केलेल्या आगाऊ रक्कमेबाबत जबाबदारी [illegible]त होणे आवश्यक आहे. तसेच साहित्याच्या प्रतिभूतीवर आगाऊ दिलेल्या रक्कम साहित्य जसजसे [illegible]साठी वापरले जाईल त्या त्या प्रमाणे मक्तेदाराच्या कामाच्या बिलामधून त्याची रक्कम वसूल करण्यात [illegible]. व केलेली पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

[illegible] मोजमाप पुस्तक क्र. ५२ पान क्र. ३३ अन्वये बाब क्रं. १ पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट [illegible]याचे ३१.०४ मे. टन व २. पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट एम एस यांचे ०.१३ मे. टन. [illegible] झाले आहे. त्याचा दर डीएसआर सन २००८-०९ प्रमाणे दर रु.६४,०५६.८५ व ६४,६१०.९७ [illegible] घेऊन अंदाजपत्रक तयार केले आहे व मक्तेदारास रक्कम अदा केली आहे. मात्र अधीक्षक अभियंता, [illegible]जनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे पत्रान्वये क्र. डिबी/डिएसआर/१८८३ दिनांक १८/३/०९

अन्वये स्टीलचे दर दि. १/४/०९ पासून कमी झाले असल्याने खालीलप्रमाणे दराने मक्तेदारास रक्कम अदा करणे आवश्यक होते. त्याबाबीचे दर पृथकरण खालीलप्रमाणे होत आहे.

| | पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट टॉर | पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट एमएस |
|---|---|---|
| मूळ दर रु. | ५८,३०० | ५७,८०० |
| (–) स्टीलचे दर कमी झाल्याने | १५,००० | १५,००० |
| एकूण | ४३,३०० | ४२,८०० |
| + १०% डोंगरी भाग | ४,३३० | ४,२८० |
| एकूण | ४७,६३० | ४७,०८० |
| + ०.७५ मूल्यवर्धित कर | ३५७.२२ | ३५३.१ |
| + ०.७५ मूल्यवर्धित कर | ४७,९८७.२२ | ४७,४३३.१० |
| मक्तेदारास अदा केलेला दर | ६४,०५६.८५ | ६४,६१०.९७ |
| फरक | १६,०६९.६३ | १७,१७७.८७ |
| परिमाण | ३१.०४ मे. टन. | ०.१३ मे. टन |
| जादा अदाई | ४,९८,८०१.३१ | २,२३३.१२ |

तरी जादा अदाई रक्कम रु. (४,९८,८०१.३१ + २,२३३.१२) = ५,०१,०३४.४३/- संबंधीताकडून वसुल करून भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

५. मोजमाप पुस्तकावर नोंदविण्यात आलेले ३ रे व ४ थे रनिंग बिलाच्या रेकॉर्ड एंट्री च्या ठिकाणी नगर अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या सह्या नाहीत.

६. सदर कामाचे अंदाजपत्रक रु.६२,३३,०२० चे असून तांत्रिक मंजूरी फी नियमाप्रमाणे ६२,३३,०२० × .०५ = रु.३१,१६५/- होत असताना रु.९१,०५५ अदा केली आहे. रु.५९,८९०/- जादा अदाई याबाबत खुलासा करून भरणा केलेली पूर्तता दाखवावी.

बाब क्र.१, २ अन्वये पाया खोदताना निघालेल्या माती /मऊ मुरुम / हार्ड मुरुम यांचा वापर बाब [illegible] मध्ये प्लिंथ भराव्यासाठी न करता बाहेरून माती / मऊ मुरुम / हार्ड मुरुम माती आणल्यामुळे [illegible]लील प्रमाणे जादा रक्कम आदा झाली आहे.

| [illegible] [illegible] [illegible] | उपलब्ध माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम | बाहेरून आणलेली माती/मऊ मुरुम/ हार्ड मुरुम व वापर | उपलब्ध माती दर | मक्तेदाराने आणलेले माती दर | दरातील फरक | जादा अदाई |
|---|---|---|---|---|---|---|
| [illegible].क्र.३ | २०७३.०१ घमी | १०६९.१५ घमी | ७० | २०५.०२ | १०३.०२ | १०६९.१५ घ.मी. × दर फरक १३५.०३ = रु.१४४३५६.६३ |

(खोदकामातून निघालेली माती/मुरुम वापरण्यास योग्य नसल्याबाबत मोजमाप पुस्तकांत नगर [illegible]अंता यांनी शेरा लिहिलेला नाही.) तरी जादा अदाई रक्कम रु.१,४४,३५६.६३ वसूल करून भरणा [illegible]ची पूर्तता दाखवावी.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.३५,६१,७८६/– लेखापरीक्षणास आक्षेपाधीन [illegible]द येत आहे. वसूल पात्र रक्कम रु.६,४५,३९१/–

**[illegible]च्छेद क्र. १७ – गुरुवार पेठ सि. स. नं. २७१ मधील आ. क्र. ५३ येथील खेळाचे मैदान [illegible]कसित करणे.नावि–६ अनुदान रु.२०.२५ लक्ष कर्ज रु.१० लक्ष एकूण ३०.२५ लक्ष .**

| | | |
|---|---|---|
| [illegible]पत्रक | : | रु.६६,४८,९४४/– |
| [illegible]कीय मान्यता | : | जिल्हा नियोजन समिती यांचे पत्र क्र. ९०५ दि. २१/३/२०१० |
| [illegible]क मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे जा. क्र. ५३० दि. २४/२/१० |
| [illegible]दार | : | श्री. अशोक ज्ञानदेव बोराटे, ओंकार कन्स्ट्रकशन, वडूज ४.९९% |
| [illegible]रंभ आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा:९८/दि. ३०/४/१० |
| [illegible]ची मुदत | : | १८० दिवस |

मोजमाप पुस्तक : क्र. ५२ पान क्र. १ ते २

लेखाशिर्ष : युडी-६

करारपत्र : रु.१५,५०० दि. २९/४/२०१०

झालेला खर्च :

| प्र. क्र. | व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ११२९ | ७/१०/१० | १९,७६,०२९ | प्रथम चालू देयक |
| १३८६ | ३/११/१० | १५,८६,६९३ | दुसरे चालू देयक |
| २४२२ | २५/३/:११ | ८,७६,११२ | तिसरे चालू देयक |
| २६५९ | ३१/३/११ | ५,३३,३४९ | चौथे चालू देयक |
| | एकूण | ४९,७२,१८३ | |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१. सदर कामाची जाहीर निविदा नोटीस दैनिक पुढारी दि. २४/३/१० मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून त्याची मुदत दिनांक ३/४/१० अखेर दुपारी ४ वाजेपर्यत होती. तथापी महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार शासन निर्णय क्र. भांखस-१०८८/२५१२ दि. २/१/९२ कलम ८.३ अ प्रमाणे निविदेस कमीत कमी ३ आठवड्यांची मुदत देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे नस्तीस अल्प कालावधीची निविदा प्रसिद्ध करण्याबाबत कारणे नमूद केलेली कागदपत्रे दिसून येत नाहीत.

२. दप्तरी उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरून सदर कामाच्या पूर्ण सर्व्हे नंबरच्या जागेची मोजणी करण्यात आलेली दिसून येत नाही.

३. सदर कामाच्या अंदाजपत्रकामध्ये डिस्पोसल ऑफ मटेरियल - ५ कि. मी. याची तरतूद नाही. तरतूद नसताना मोजमाप पुस्तक क्र. ५२ पान क्र. १, ३५, ४५ अन्वये एक्स्ट्रा आयटेम म्हणून ११०३४.०१ घ. मी रक्कम रु. १४,९०,०३३/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. मनपा लेखा संहिता १९७१ नियम १६(२) अन्वये अंदाजपत्रकापेक्षा १०% पेक्षा जादा खर्च होत असल्यास सुधारीत अंदाजपत्रक करून त्यास फेर प्रशासकीय/तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

कामाचे अंदाजपत्रका सोबतचे दर पृथकरणाची प्रत नाही. मात्र डिस्पोसल ऑफ एक्सव्हेटेड साठी ५ कि.मी. इतके लिड घेऊन त्या प्रमाणे मक्तेदारास रक्कम अदा केली आहे. परंतु च्या याच विभागामार्फत केलेल्या दुसऱ्या कामातील या बाबीचे १.५ कि. मी इतके लिड ऊन दर पृथककरण केले असून त्याप्रमाणे मक्तेदारास रक्कम आदा केल्या आहेत. प्रत्यक्षात सदर ठिकाण ते सोनगांव कचरा डेपो हे अंतर साधारणता ३.५ कि.मी. इतके आहे.

घेतलेले लिड दरासाठी अंतर – ५ किमी दर रु.१३५.०४

अनुज्ञेय होत असलेले लिड अंतर – ३.५ किमी. दर रु.११५.८१

फरक रु.१९.२३ × ११०३४.०१ घमी = रु.२,१२,१८४/-

तरी ५ कि. मी. इतके अंतर घेऊन मक्तेदारास आदा केलेले दर लेखा परीक्षणात मान्य करता येत दा लिड घेऊन आदा केलेली रक्कम संबंधीताकडून वसुल करून भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

नस्तीस असलेले आर्किटेक्ट यांचे दि. १/७/२०१० च्या पत्रा अन्वये हार्ड स्ट्राटा १७ ते २० फूट असल्याचे व संरक्षित भिंत करण्याबाबत कळविले आहे. परंतु मनपा लेखा संहिता १९७१ नियम ५ अन्वये तपशीलवार अंदाजपत्रक तयार करण्या अगोदर जागेचे स्थानिक निरीक्षण करणे तसेच ट्रायल पीट घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच संरक्षित अंदाजपत्रक करण्यात आले नाही. त्यामुळे अंदाजपत्रक हे वास्तववादी केले नसल्याचे दिसून येते.

महसूल व वन विभाग, यांची अधिसूचना क्र. गौखनि/१०/०२०६/प्र. क्र. ५७/ख/ दिनांक /२०१० नुसार गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम रु.२००/- प्रति ब्रास याप्रमाणे वसुल करून भरणा करणे आवश्यक असता खाली नमूद केलेल्या बाबींची स्वामित्व धनाची रक्कम कपात आली नाही.

| देयक क्र. | बाब क्रं. | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | युसीआर मॅसनरसी सँड | ५५.५८ घ.मी | ७०.६८ | १०,८४१ |
| २ | | १५.५२ | | |
| ३ | | ८२,२९ | | |
| | एकूण | १५३.३९ घमी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | सीसी. १:२:४ | ८८.६२ घमी | ७०.६८ | ६,२६४ |
| | एकूण | २२३.३९ घमी. | | १७,१०५ |

तरी कमी रॉयल्टी रक्कम रु.१७,१०५/- वसुल करून शासन भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

७. स्थायी निदेश ३७ परि. क्र. १६ ते २० व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रं. जी आर- ३४/सा.४/५९९० दिनांक ८/१/२००७ तसेच महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभागाचे पत्र क्र.पंरास- १०८९/प्र. क्र. १४५२५/३५ दिनांक १५/२/१९९० नुसार बांधकामाचे गुणनियंत्रण योग्य प्रकारे होण्यासाठी वापरावयाचे दगड, खडी, कॉंक्रीट यांची शासकिय प्रयोग तंत्रशाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. मात्र या प्रमाणे गुणनियंत्रण अहवाल दप्तरी नाहीत. तसेच सदर नस्तीस मुख्याधिकारी नगरपरिषद, सातारा यांचे पत्र क्र. जा.क्र. सानप/साबा/४९४ दिनांक २४/८/१० अन्वये मक्तेदाराने बांधकामावर पाणी मारले नसल्याबाबत त्यांना काढलेल्या पत्र आहे. त्या अन्वये सदरचे काम शासनाच्या स्टॅंडर्ड स्पेसिफिकेशनप्रमाणे होत नसल्याचे दिसून येते. तरी याबाबतची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

८. मोजमाप पुस्तक पान क्र. ४५ बाब क्र. १५ चौथे रनिंग बिलामधून मटेरियल ॲट साईट या आधारे ॲडव्हान्स पेमेंट मक्तेदाराला खालीलप्रमाणे अदा करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट ९ मे. टन. रु.४७,००० | रु.४,२३,००० |
| २. | सिमेंट - २०० बॅग रु. २५०/- | रु. ५०,००० |
| ३. | वाळू व मेटल लमसम | रु. ३५,००० |

मटेरियल ॲट साईटल या आधारे ॲडव्हान्स पेमेंट मागणी करण्याबाबतचा मक्तेदाराचा अर्ज दप्तरी नाही. तसेच स्टील व वाळू/मेटल यांचे डिटेल मोजमापे घेण्यात आली नाहीत. त्याचप्रमाणे सदर साहित्य कामाच्या ठिकाणी आणले असल्याबाबतचे प्रमाणपत्र दप्तरी नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मध्ये आगाऊ रक्कमा अदा करण्याबाबत तरतूद नाही. परंतु त्यातील नियम क्र.१८५ अन्वये शासकिय सार्वजनिक बांधकाम विभागाची नियमपुस्तिका व्यवहार्य असेल तेथे वापरता येईल. त्या अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहिता नियम क्र. १०.२.२१ अन्वये कामाच्या जागेवर

...च्या साहित्याच्या प्रतिभूतीवर अशा सामानाच्या मूल्यांच्या ७५% रक्कम मंजूर करता येते. मात्र ...रकमी १००% रक्कम अदा केली आहे. तरी १००% आगाऊ रक्कम कशी व काय आधारे आदा ... नियमबाह्यतेबाबत खुलासा करून जादा अदा केलेल्या आगाऊ रक्कमेबाबत जबाबदारी निश्चित ...वश्यक आहे. तसेच साहित्याच्या प्रतिभूतीवर आगाऊ दिलेली रक्कम साहित्य जसजसे कामासाठी ...जाईल त्या त्या प्रमाणे मक्तेदाराच्या कामाच्या बिलामधून त्याची रक्कम वसूल करण्यात यावी व ...पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

सदर कामाची मुदत १८० दिवस असून माहे सप्टेंबर २०१० अखेर काम पूर्ण होणे आवश्यक ...मुदत वाढीबाबतचा मक्तेदाराचा अर्ज व ठराव तसेच काम विहीत वेळेत केले नसताना बी-१ ...तील क्लॉज २ अन्वये करावयाची दंडात्मक कार्यवाहीची कागदपत्रे दप्तरी नाहीत.

मोजमापे पुस्तकामध्ये रेकॉर्ड एंट्रीच्या तारखा नाहीत. त्यामुळे काम कधी सुरू झाले याची पडताळणी ...झाली नाही. तरी याबाबत खुलासा करून पूर्तता दाखवावी.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.४७,४२,८९४/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ...त येत आहे. वसूल पात्र रु.२,२९,२८९/-

**...द क्र. १८ :- जादा दराने ब्लीचिंग पावडर खरेदी केल्याबाबत.**

न. पा. साताराने वर्ष २०१०-११ मध्ये खालील प्रमाणे ब्लीचिंग पावडर खरेदी केली आहे.

| | पुरवठादार | खरेदीचा दर | परिमाण | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १) | गुरुदत्त एंटरप्रायजेस अंबवडे ता. कोरेगांव. | २२,३००/- प्रति टन | २५ टन | ५,५७,५०० |

वरीलप्रमाणे ब्लीचिंग पावडर खरेदीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदरच्या खरेदीसाठी वर्ष २००९-१० या आर्थिक वर्षात निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरच्या निविदा वर्ष २००९-१० साठी होत्या. त्याच आधारे वर्ष २०१०-११ मध्ये खरेदी झाली आहे. वर्ष २०१०-११ मधील खरेदी कामी पुन्हा नव्याने निविदा मागविणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

२) वर्ष २००९-१० अन्वये वर्ष २०१०-११ मध्ये ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याबाबत स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील जिल्हा दर सूचीप्रमाणे ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याचे दर प्रती किलोस रु.१९/- व प्रती टनास रु.१९,०००/- असे आहेत. प्रमाणित दर आणि न. पा. ने खरेदी केलेले दर यातील तफावत प्रती टनास रुपये २२,३०० - १९,००० = ३,३००/- एवढी आहे.

वर्ष २०१०-११ मध्ये न. पा. ने एकूण २५ टन एवढी ब्लिचिंग पावडर खरेदी केली आहे. त्यानुसार २५ × ३३०० = ८२,५००/- रुपये एवढ्या रकमेचे न. प. चे नुकसान झाले आहे.

तरी जादा दरामुळे झालेल्या नुकसानीची जबाबदारी संबंधीतांवर निश्चित करून रुपये ८२,५००/ वसुलांत आणून न. पा. निधीत भरणा करावेत. पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

पाणीपुरवठा विभाग, न. पा. सातारा

**परिच्छेद क्र. १९ - नागरी सुविधा केंद्र (सी.एफ.सी.) व सर्व्हर रुम तयार करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | र. रु.१०,७६,१२३/- |
| प्रशासकीय मान्यता | : | सर्व. सभा. ठ. क्र. १०३६ दि. २५/८/१० |
| तांत्रिक मान्यता | : | कार्य. अभि. मजीप्रा. जा. क्र. /चिशा/ता.मं./४२६५ दि.१५/१०/१०. |
| मक्तेदाराचे नाव | : | विकास कल्याण माडगुळकर |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सां.बा./८६९ दि. २८/१२/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम पूर्ण दि. २७/२/११ |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४७ पान क्र. ९९ ते १०१, ११७ ते ११८ व १२७ ते १३३ |
| लेखाशिर्ष | : | नागरी सुविधा केंद्र व सर्व्हर रुम तयार करणे (ई-गव्हर्नन्स अंतर्गत) |
| करारपत्र | : | रु.२,६००/०० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.५२,७७१/- कार्यकंत्राट कर रु.४२,२१७/- आयकर रु.१०,५५५/- विमा रु.१०,५५५/- |

| प्रमाणक क्र. व दिनांक | | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| २२२९ | ९/३/११ | १,००,००० | अंशत: प्रदान (पार्ट पेमेंट) |
| २२६६ | १४/३/११ | १,४९,५१५ | अंशत: प्रदान |
| २५३५ | ३१/३/११ | २,३०,००० | अंशत: प्रदान |
| २५६६ | ३१/३/११ | २,००,०१४ | अंशत: प्रदान |
| | | ६,७९,५२९ | एकूण प्रदान |

एकूण खर्च रु.१०,५५,४१५ /- ३ रे व अंतिम देयकानुसार

...रोक्त कामासंबंधित नस्ती, मोजमाप पुस्तक, प्रमाणके इ. चे लेखापरीक्षण केले असता ...माणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

...सदर कामाचे अंदाजपत्रक पाहता त्यात फ्लश डोअर व खुर्च्यांचा समावेश असून प्रती दरवाजा ...र्चीचा दर अनुक्रमे रु.११,२००/- व रु.३,४००/- देणेत आला आहे. परंतु सदर दरवाजाचे/ ...चे स्पेसिफिकेशन नमुद केलेले नाहीत. स्थानिक विक्रेत्यांकडून दरवाजे/खुर्चीची दरपत्रके घेण्यात ...असून त्यातील स्पेसिफिकेशननुसार दर नमूद केलेले नाही. त्यामुळे दरवाजा व खुर्चीच्या दराच्या ...बाबत व स्पेसिफिकेशन आवश्यकतेनुसार असल्याची तसेच गुणवत्तेनुसार किंमत असल्याची ...करता आली नाही. तसेच सदर खुर्च्या खरेदी करताना शासन दरकरार किंवा महा. लघु उद्योग महा. ...कडील दरकराराबाबत चौकशी करणेत आलेली नाही. तरी सदर दर शासन दरकरारापेक्षा जादा ...ल्यास त्याची वसुली होणे आवश्यक आहे.

मजुरीचा दर साहित्याचे ३५% कशाचे आधारे घेणेत आला याबाबतचा खुलासा करावा.

लॅमिनेटच्या प्रकाराबाबत (स्पेसिफिकेशन) अंदाजपत्रकात उल्लेख नाही. त्यामुळे अपेक्षित लॅमिनेट ...त्यक्ष वापरलेले लॅमिनेट व त्याअनुषंगाने प्रदान केलेला दर त्याच्या गुणवत्तेनुसार योग्य असल्याची ...करता आली नाही.

अंदाजपत्रकात ऑईल पेंट व लस्टर पेंट, पॉलिशचे दर स्थानिक विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून ...तील न्युनतम दर समाविष्ट केले आहेत. सदर अंदाजपत्रकातील इतर बाबींकरीता जि. दरसूची (सार्व.

बांध.) सन ०८-०९ चे दर वापरले असून सदर डी. एस. आर. मधे ऑईल पेंट रु.१७६/-, लस्टर पेंट रु.१७८/- प्रति लिटर असताना अंदाजपत्रकात जादा दर आकारल्याने खालीलप्रमाणे रक्कम जादा आकारली आहे.

| बाब क्र. तपशिल | अंदाजपत्रकानुसार दर | मापे | प्रदान रुपये |
|---|---|---|---|
| ४१ ऑईल पेंट | ४३०.४० | ७३.९४ स्के.म | १४,०८४ |
| ४२ लस्टर पेंट | १९०.०० | १५७.३० स्के.मी. | २९,८८७ |
| जादा आकारलेला दर | | | |
| १) ऑईल पेंट | रु.४३०.४० - १७६ = रु.२५४.४० x ७३.९४ = रु.१८,८१०/- | | |
| २) लस्टर पेंट | रु.१९० - १७८ = रु.१२ x १५७.३० = रु.१,८८८/- | | |

वरील बाबींकरीता एकूण रु.२०,६९८/- जादा अदाई झाली असून वसुलपात्र आहे.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता होईपर्यंत र. रु.२०,६९८/- वसुलपात्र असून उर्वरित खर्च रु.१०,३४,७१७/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. २० :- भैरोबा मंदीर शेजारी रस्ता काँक्रीट करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु. १,३३,४००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | स्थायी समिती ठराव क्र. १४४४, दि.२५/१०/१० |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे जा. क्र. ४२ दि.६/१/११ |
| मक्तेदार | : | श्री. विनायक साहेबराव साळुंखे २०% अधिक्य सन १०-११ डीएसआर शी तुलना करीता २.१३% अधिक्य |
| कार्यारंभ आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/११२४ दि. ८/३/११ |
| कामाची मुदत | : | ३० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५४ पान क्र. ११ |
| लेखाशिर्ष | : | रस्ते. |

: रु.४२०/- दि. १७/२/११

: सुरक्षा ठेव रु.७,२१९ सेल्टॅक्स (कार्यकंत्राट दर) रु.२,८८८

आयकर रु.१,४४४ रॉयल्टी रु.६,६२२ विमा रु.१,४४४

: 

| प्र.क्र. व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| २५०९/ ३१/३/११ | १,४४,३७५ | प्रथम व अंतिम देयक |

...क्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

... कामाचे अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या डीएसआर च्या दराप्रमाणे करण्यात येऊन ...विण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे प्राप्त निविदेतील दर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १०% पेक्षा ...ले असल्याने सन १०-११ च्या डीएसआर च्या दराने करून सन २००८-०९ च्या डीएसआर ... तुलना करण्यात आली आहे. मात्र सन २०१०-११ चे केलेल्या अंदाजपत्रकावर नगर अभियंता ... नाही.

बाब क्र. १ अन्वये पाया खोदताना निघालेल्या माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम यांचा वापर बाब क्र. ... प्लिंथ भराव्यासाठी न करता बाहेरून माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम माती आणल्यामुळे खालील ...जादा रक्कम आदा झाली आहे.

| ...व ...क्र. | उपलब्ध माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम | बाहेरुन आणलेली माती/हार्ड मुरुम/ हार्ड मुरुम व वापर | उपलब्ध माती दर | मक्तेदाराने आणलेले माती दर | दरातील फरक | जादा अदाई |
|---|---|---|---|---|---|---|
| ...क्र.१९ | १७.४५ घमी | ४९.८१ घमी | ७० | २०५.०२ | १३५.०२ | ४९.८१ घमी × दर फरक १३५.०२ = रु.६,७२५ |

...क्रमातून निघालेली माती/मुरुम वापरण्यास योग्य नसल्याबाबत मोजमाप पुस्तकात नगर अधियंता यांनी ...लिहिलेला नाही.) तरी जादा अदाई रक्कम रु.६,७२५/- वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

३) बाब क्र. ४ प्लिंथ भराव्यासाठी आणलेल्या मुरुमाची रॉयल्टी रु.३,५२०/- ची रक्कम वसूल करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तरी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनि/१०/०२०६/प्र.क्र.५७/ख/दिनांक १५/१२/२००६ नुसार गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम रु.३,५२०/- वसूल करून शासन भरणा करण्यात यावी.

४) ठेकेदाराची व्हॅट क्रमांक नोंदणी विक्रीकर विभागाकडे झालेले पत्र दप्तरी नाही. त्यामुळे विक्रीकर आयुक्त, मुंबई यांचे नोटिफिकेशन दिनांक १/४/२००५ नुसार ४% रक्कम वर्क्स टॅक्स म्हणून रक्कम रु.५,७७५/- वसूल होणे आवश्यकता असताना ती २% रक्कम रु.२,८८८/- केल्याने उर्वरित रक्कम रु.२,८८७/- वसूल करून भरणा होणे आवश्यक आहे.

वरील आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.१,३१,२४३/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत. वसूल पात्र र. रु.१३,१३२/-

**परिच्छेद क्र. क्र. २१ :- सि. स. नं. २०१ गोडोली येथील दवाखान्याचा पत्रा बदलणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.२,००,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | ठराव क्र. १२६१ दि. ४/५/२०१० |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र. चिशा/तांम/२३६७ दि. ५/६/१० |
| मक्तेदाराचे नांव | : | श्री. विनायक साहेबराव साळुंखे |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/६३१ दि.२३/९/१० |
| कामाची मुदत | : | ९० दिवस काम पूर्ण - दि.७/१०/१० |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५० पान क्र. १६ ते १७ |
| करारपत्र | : | रु.६०० दिनांक २३/९/२०१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.८,६३२ कार्यकंत्राट कर (सेल टॅक्स) रु.३,४५३ आयकर रु.१,७२६ विमा रु.१,७२६ |

:

| प्र.क्र | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १०३८ | २९/१२/१० | १,७२,६३९ | रु.१,००,००० व वजाती |
| १९९० | १४/२/११ | | रु.५७,१०२ |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

मोजमाप पुस्तक ५० पान क्र. ११ अन्वये बाब क्र. १ प्रोव्हायडींग स्ट्रक्चरल स्टील वर्क इन रोलड् ...सड विथ झेनेक्सटींग प्लेटस किंवा ॲगल्स ट्रूसेस प्रीलीज याचे १.१०३ मे. टन. काम झाले ...चा दर डीएसआर सन २००८-०९ प्रमाणे रु.६९,०४४/- असा घेऊन अंदाजपत्रक तयार केले ... रु.६०,१७८/- प्रति मे. टन या दराप्रमाणे देयकात दर घेऊन मक्तेदारास रक्कम अदा केली ... अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे पत्रान्वये क्र. डिबी/डिएसआर/ ... अन्वये स्टीलचे दर दि. १४/३/२०१० पासून कमी झाले असल्याने खालील प्रमाणे दराने ... रक्कम अदा करणे आवश्यक होते. त्या बाबीचे दरपृथकरण खालीलप्रमाणे होत आहे.

| | |
|---|---|
| मूळ दर रु. | ६२,३००.०० |
| (-) स्टीलचे दर कमी झाल्याने रु. | ११,५००.०० |
| एकूण रु | ५०,८००.०० |
| ÷ १०% डोंगरी भाग रु. | ५,०८०.०० |
| एकूण रु. | ५५,८८०.०० |
| ÷ ०.७५ मूल्यवर्धित कर रु. | ४१९.०० |
| एकूण रु. | ५६,२९९.०० |

मात्र प्रत्यक्षात रु.६०,१७८/- या दराने १.१०३ एम टी = रु.६६,३७६.३३ ही रक्कम मक्तेदारास ... केली आहे. अनुज्ञेय रक्कम रु.५६,२९९ × १.१०३ = ६२,०९७.७९. तरी जादा अदाई रक्कम ... ६६,३७६.३३ - ६२,०९७.७९) = रु.४,२७९/- संबंधीतांकडून वसूल करून भरणा केल्याची ...ा दाखवावी.

२) ठेकेदाराची व्हॅट क्रमांक नोंदणी विक्रीकर विभागाकडे झाल्याबाबतची कागदपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे विक्रीकर आयुक्त, मुंबई यांचे नोटिफिकेशन दिनांक १/४/२००५ नुसार ४% रक्कम वर्क्स टॅक्स म्हणून वसूल होणे आवश्यक असताना ती २% केल्याने उर्वरित २% रक्कम रु.३,४५३/- वसुल करून शासन भरणा करावी.

३) मोजमाप पुस्तकातील सदर कामाच्या रेकॉर्ड एंट्री चेक केल्याबाबत नगर अभियंता / उपविभागीय अभियंता यांच्या सह्या नाहीत. तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम क्र. १७(२) अन्वये बांधकामाच्या निरीक्षणासंबंधी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

४) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम क्र. १७६ अन्वये परिपूर्तीचा अहवाल दप्तरी असून तो कोरा आहे. त्या कोऱ्या नमुना १३२ वर नगरपरिषद अभियंता यांनी सही केल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

५) जुने साहित्य जमा केल्याबाबतच्या नोंदी दप्तरी नाहीत.

६) मेजरमेंट वरील मापे मान्य म्हणून मक्तेदाराची सही घेण्यात आली नाही. तसेच रक्कम अदा केल्यानंतर मेजरमेंट कर्ण रेषा मारण्यात आली नाही. या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.१,६४,९०७/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. वसूल पात्र रु.७,७३२/-

**परिच्छेद क्र. २२ :- श्री. छत्रपती सुमित्राराजे उद्यानाच्या कडेला बागगृह बांधणे.**

**(बीओटी क्षेत्र वगळून)**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१०,००,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | ठराव क्र. ८५१ दि.२५/१/१० |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र.चिशा/तांम/२६१४<br>दि. ५/७/२०१० |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. हेमंत दत्तात्रय दरेकर |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/१०२/ दि. ३०/४/१० |

...मुदत : १२० दिवस,

...पुस्तक : क्र.४५ पान क्र. १३५ ते १४८

... : रु.२,५०० दिनांक ३०/४/२०१०

... : सुरक्षा ठेव रु.५१,३३२ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.२४,४८८

आयकर रु.१३,३५८ रॉयल्टी रु.१४,३२१

...दर्भ :

| ...क्र | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ...८६ | ४/९/१० | ६,०७,१९४ | प्रथम चालू देयक त्यातील पार्ट पेमेंट |
| ...१७० | ११/२/११ | – | वरीलप्रमाणे |
| ...१९९ | ९/३/११ | ४,१९,४३३ | दुसरे चालू देयक |
| | एकूण | १०,२६,६२७ | |

...परोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

...वर कामाचे अंदाजपत्रकावर नगर अभियंता व आर. सी. सी. डिझाईनवर नगर अभियंत/ ...कारी न. पा. सातारा यांची सही नाही.

...बाब क्र. ८ – पी/एफ एचवायएसडी बार रिइनफोर्समेंट टॉर स्टील याचे मोजमाप पुस्तक क्र.१४५ ...१४४, १४५ अन्वये वजन ३४४५.५० किलो झाले आहे. ३.४४५ मे. टन मात्र प्रत्यक्षात ३.५० ...चे माप घेऊन मक्तेदारास रक्कम अदा केली आहे. तरी अतिप्रदान परिमाण ०.०५५ × दर ...६ = रु.३,००९/- तरी अतिप्रदान रक्कम रु.३,००९/- वसूल करून भरणा केल्याची पूर्तता ...वी.

...बाब क्र. १ अन्वये पाया खोदताना निघालेल्या माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम यांचा वापर बाब ...प्लिंथ भरण्यासाठी न करता बाहेरून माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम माती आणल्यामुळे खालील ...जास्त रक्कम आदा झाली आहे.

| मोजमाप पुस्तक व पान क्र. | उपलब्ध माती/मऊ मुरुम/हार्ड मुरुम | बाहेरुन आणलेली माती/मऊ मुरुम/ हार्ड मुरुम व वापर | उपलब्ध माती दर | मक्तेदाराने आणलेले माती दर | दरातील फरक | जादा अदाई |
|---|---|---|---|---|---|---|
| ४५ व ५० पान क्र.३५ व ४ | ६१.१४ घमी | ३१.३५ घमी | ७० | २०५.०२ | १३५.०२ | ३१.३५ घमी × दर फरक १३५.०३ = रु.४,२३३/- |

(खोदकामातून निघालेली माती/मुरुम वापरण्यास योग्य नसल्याबाबत मोजमाप पुस्तकात नगर अभियंता यांनी शेरा लिहिलेला नाही.) तरी जादा अदाई रक्कम रु.४,२३३/- वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

उपरोक्त आक्षेपाची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.१०,१९,३८५/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. वसूल पात्र रु.७,२४२/-

**परिच्छेद क्र.२३ :- वार्ड क्र. १० गोडोली येथील न. पा. च्या मालकीच्या विहीरीतील गाळ काढणे, दुरुस्ती करून जाळी बसविणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१,५०,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | ठराव क्र. १२६६ दि.४/५/२०१० |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र.चिशा/तांम/२२१२/ दि. २१/५/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. विनायक साहेबराव साळुंखे ५% अधिक्य |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/२१२ दि. २६/५/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम पूर्ण दि.२/६/१० |
| मोजमाप पुस्तक | : | क्र.४५ पान क्र. ८३ ते ८६ |
| करारपत्र | : | रु.४०० दिनांक २६/५/२०१० |

: सुरक्षा ठेव रु.८,२४३ सेलटॅक्स (कार्यकंत्राट कर) ३,२९७

आयकर रु.३,६२७ रॉयल्टी रु.१६८

:

| प्र.क्र | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ५०७ | ३/७/२०१० | १,६४,८५२ | |

[illegible] प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

[illegible] पुस्तक ४५ पान क्र. ८५ अन्वये बाब क्र. ४ प्रोव्हायडींग आणि फॅब्रीकेटींग स्ट्रक्चरल [illegible] ०.७६ मे. टन काम झाले आहे. त्याचा दर डीएसआर सन २००८-०९ प्रमाणे त्याचा दर [illegible] घेऊन अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु रु.६०,१७८/- प्रति मे. टन या दराप्रमाणे [illegible] घेऊन मक्तेदारास रक्कम अदा केली आहे. मात्र अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम [illegible] यांचे पत्रा अन्वये क्र. डिबी/डिएसआर/दिनांक - अन्वये स्टीलचे दर दि.१५/३/२०१० [illegible] झाले असल्याने खालीलप्रमाणे दराने मक्तेदारास रक्कम आदा करणे आवश्यक होते. त्या [illegible] खालीलप्रमाणे होत आहे.

| | |
|---|---|
| [illegible] दर रु. | ६२,३००.०० |
| (-) स्टीलचे दर कमी झाल्याने रु. | ११,५००.०० |
| [illegible] रु. | ५०,८००.०० |
| [illegible] १०% डोंगरी भाग रु. | ५,०८०.०० |
| [illegible] रु. | ५५,८८०.०० |
| [illegible] ०.७५ मूल्यवर्धित कर रु. | ४१९.०० |
| [illegible] रु. | ५६,२९९.०० |

मात्र प्रत्यक्षात रु.६०,१७८/- या दराने मक्तेदारास रक्कम आदा केली आहे. तरी ६०,१७८/- [illegible] रु.५६,२९९ = ३,८७९ × परिमाण ०.७६ = रु.२,९४८/- इतकी रक्कम जादा अदाई झाली [illegible] तरी रुपये २,९४८/- संबंधीताकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

२) ठेकेदाराची व्हॅट क्रमांक नोंदणी विक्रीकर विभागाकडे झाल्याबाबतची कागदपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे विक्रीकर आयुक्त, मुंबई यांचे नोटिफिकेशन दिनांक १/४/२००५ नुसार ४% रक्कम वर्क्स टॅक्स म्हणून वसुल होणे आवश्यक असताना ती २% केल्याने उर्वरित २% रक्कम रु.३,२९७/- वसुल करून शासन भरणा करावी.

३) मोजमाप पुस्तकातील सदर कामाच्या रेकार्ड एंट्री चेक केल्याबाबत नगर अभियंता / उपविभागीय अभियंता यांच्या सह्या नाहीत. तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम क्र. १७(२) अन्वये बांधकामाच्या निरीक्षणासंबंधी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

४) सदरची विहीर न. पा. च्या मालकीची असल्या बाबतची कागदपत्रे नस्तीस नाहीत.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.१,५८,३०७/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. वसूलपात्र रु.६,२४५/-

**परिच्छेद क्र. २४ :- पेठ मल्हार सि.स. नं. ७५ येथे व्यापारी संकुल बांधणे.**

योजनेचे नाव – आयडीएसएमटी (एकात्मिक शहर विकास योजना)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रमाणक क्र. व दिनांक | २०६३ | २/२/१० | ३ रे धावते देयक रु. ५७,३४५/- |
| | २२५३ | १०/३/११ | ४ थे धावते देयक रु.६,८५,६९३/- |
| | | | एकूण रु. ७,४३,०३८/- |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रशासकीय मान्यता क्र. व दिनांक | : | सर्वसाधारण सभा ठ. क्र. ७३० दि. १०/१०/०५ | |
| तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक | : | ३९३ दि. २८/६/०५ | |
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.६०,०१,५४३/- | |
| निविदा रक्कम | : | रु.५६,६१,८८३/- | |
| मक्तेदाराचे नाव | : | मे. पुनम कन्स्ट्रकशन | |
| कामाचा आदेश जा. क्र. | : | ६०८ | दिनांक ३१/१०/२००५ |
| कामाची मुदत | : | ९ महिने | करारपत्र मुद्रांक रु.७,८००/- |

: ५५ पान क्र. ९ ते १३

दिनांक : काम चालू

देयकामध्ये बाब क्र. ३ सी. सी. एम-२० चे परिमाण ४३.८२ घनमीटर अदा केले मापन पुस्तक क्र. ५५ पान नं. ११ वर सदर बाबीचे परिमाण ४२.०४८ होत आहे. म्हणजेच चे अतिप्रदान झाले आहे. त्याचा दर रु.३,०३८.५८ प्रति घनमीटर असल्याने त्याची × ३०३८.५८ = ५५,३८४.३६ म्हणजेच रु.५,३८४/- संबंधीताकडून वसूली करून

आक्षेपाच्या पूर्ततेअभावी खर्च रु.७,३७,६५४/- वसूल पात्र रु.५,३८४/-

**. २५ - खाजगी वाहनाने मुंबई प्रवासाबाबत.**

२५६९ दि. ३१/३/११ रु.३,४५९/- वाहन क्र. एमएच ११ ए. के. ६१९

खालील प्रमाणे घेण्यात येत आहे.

. अनंत सुरेश प्रभुणे, अभियंता यांनी खाजगी वाहनाने सातारा-मुंबई प्रवास केला आहे. सदर अधिकाऱ्याची मान्यता आदेश पहावयास मिळाला नाही.

कर्मचारी यांना न. पा. किंवा खाजगी वाहनाने प्रवास करणे अनुज्ञेय नसताना खाजगी प्रवास केला आहे. सातारा-मुंबई प्रवास भाडे रु.५२६/- वजा जाता रु.२,९३३/- ची वसुली कडून करून अनुपालन सादर करावे. वसूलपात्र रक्कम रु.२,९३३/-

**क्र.२६ - वॉर्ड क्र. ३७ पेठ मंगळवार पद्मावती मंदिर ते शिंदे घर अखेर पाईप ड्रेन करणे.**

| | | |
|---|---|---|
| | : | रु.१,३२,०६५/- |
| मान्यता | : | मे. स्थायी समिती ठराव क्र. १२१७, दि.४/५/१०. |
| मान्यता | : | जा. क्र./चिशा/तां.मं./२४५/१० दि. १६/६/१० |
| चे नाव | : | श्री. मधुकर ज्ञानदेव शिंदे |
| चे आदेश | : | जा. क्र./सानप/सां.बा./पा./६७६ दि. ४/१०/२०१० |

| | | |
|---|---|---|
| कामाची मुदत | : | ६० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५३ पान क्रं. ३ ते ४ |
| करारपत्र | : | रु.४२०/- |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.६,४२२ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.५,१३८ |
| | | आयकर रु.१२८४ विमा रु.१,२८४ रॉयल्टी रु.२७५ |
| झालेला खर्च | : | प्र. क्र.२५१२ दि. ३१/३/११ रक्कम रु.१,२८,४४१/- |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर कामाची जाहीर निविदा दै. ग्रामोद्धारमध्ये दिनांक ८/७/१० रोजी प्रसिद्ध करण्यात आली. निविदेमध्ये प्राप्त निविदा दि.६/८/१० अखेर स्विकारून शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता हजर मक्तेदारांसमोर मुख्याधिकारी यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील असे स्पष्ट नमूद असताना प्राप्त तीनही निविदा दिनांक १३/८/१० रोजी मुख्याधिकारी यांचेसमोर विलंबाने उघडण्यात येवून कायदिश दि.४/१०/२०१० रोजी देण्यात आले. तरी विलंबाबाबत खुलासा करावा.

२) न. नं. १३३ काम पूर्ण झाल्याबाबतच्या प्रमाणपत्रावर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तरी स्वाक्षरी घेवून पुर्तता दाखवावी.

३) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.१०/२००६/प्र.क्र.५७/दिनांक ११/२/२०१०

मोजमाप बाब क्र. ७ मध्ये १ ; २ : ४ कॉंक्रीट यांची रॉयल्टी १४.८३ घ. मी. × ७०.६८ प्रमाणे र. रु। १,०४८/- गौण खनिजाची रक्कम होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.तरी र. रु. १,०४८/- वसुल करून भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

**२७ :- वॉर्ड क्र. ३६ पेठ मंगळवार सि. स. नं. ६४४ ते सुरेश भोकरे घर ते घंटवेकर आर. सी. सी. गटर करणे.**

| | | |
|---|---|---|
| | : | रु.६१,८००/- |
| ान्यता | : | ठराव क्र.९७१ दि. १३/५/०८ |
| | : | - |
| ाव | : | कैलास प्रभाकर सांगलीकर |
| | : | जा. क्र./सानप/सांबा/श./१६६७ दि. २७/२/०९ |
| | : | ६० दिवस. |
| | : | क्र. ३८ पान क्र. ११७ ते ११९ |
| | : | रु.२६० दिनांक २७/२/०९ |
| | : | सुरक्षा ठेव रु.३,०१८ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.२,४१४ |
| | | आयकर रु.१,२०७ विमा रॉयल्टी रु.६१० |
| | : | प्र.क्र. १६८७ दिनांक २९/१२/१० रक्कम रु.६०,३५४/- |

रोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

रोक्त कामाच्या देयकांतून शासकिय विमा निधीची १% प्रमाणे होणारी रक्कम रु.६०४/- कडून वसूलांत आणून शासकिय विमा निधी खाते भरणा केलेची पूर्तता दाखवावी.

कामाची निविदा दैनिक तिरंगा टाइम्सला दि. ३/६/०८ रोजी प्रसिद्ध करून दि.२/७/०८ अखेर मागविण्यात आले होते. प्राप्त तीन निविदा दि. १०/७/०८ रोजी मुख्याधिकारी यांचेसमोर आल्या. त्यामधील श्री. कैलास प्रभाकर सांगलीकर यांचे अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% सर्वांत कमी असणाऱ्या दरास ठराव क्र.११७० दिनांक २२/८/०८ अन्वये मंजूर देण्यात आली. दाराला कामाचे आदेश दिनांक २७/२/०९ ला देण्यात आले. विलंबाबाबत खुलासा करावा.

सदरचे काम कधी पूर्ण करण्यात आले त्याचा दिनांक न. नं. १३३ वर व मोजमापावर नमूद नाही. काम पूर्ण झाले कि अपूर्ण आहे याचा खुलासा व्हावा.

४) नमुना नं. १३३ काम पूर्ण झाल्याबद्दलचे प्रमाणपत्रावर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तरी स्वाक्षरी घेवून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. २८ : - न. पा. कर्मचाऱ्यांचे ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीबाबत व जादा वेतन अदाईबाबत.**

न. पा. सातारा कडील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळल्या.

१) श्री. सुहास मा. पवार, कनिष्ठ लिपिक (वे. श्रे. ५२०० - २०,२०० ग्रेड पे २४००)

६ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करताना दि.१/१/०६ रोजी र. रु.५,५००/- ऐवजी रु.५,६००/- प्रमाणे वेतन निश्चिती करणेत आली आहे.

वरीलप्रमाणे जादा मूळ वेतनावर वेतन निश्चिती केल्याने संबंधितास जादा वेतन अदा झाले आहे. तरी संबंधितांची वेतन निश्चिती सुधारीत करणेत येऊन जादा अदा वेतनाची रक्कम संबंधिताकडून वसुलात आणून पूर्तता दाखवावी.

२) सेवापुस्तकांची वेतन देयकांसह पडताळणी केली असता खालील प्रमाणे जादा वेतन अदा करण्यात आल्याचे आढळले.

| कर्मचाऱ्याचे नाव | देय रक्कम | दिलेले वेतन देयकानुसार | जादा वेतन वेतनाचा कालावधी |
|---|---|---|---|
| श्री. युवराज श्री. शिंगाडे बांध. बिगारी | ७,४२० | ७,६७० | १/१० ते २/११ |

उपरोक्त नमूद केलेप्रमाणेजादा अदा वेतनाची संबंधिताकडून वसुली करून न. पा. निधीत जमा करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. २९ :- कोर्ट केसेस नोंदवही व वकिल फी अदाईबाबत.**

न. पा. साताराकडील कोर्ट केसेस नोंदवही व वकिल फी अदाईचे सन २०१०-११ करीता लेखा परीक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) कोर्ट केसेस करीता नोंदवही ठेवणेत आली आहे. परंतु सदर नोंदवही महा. न. प. लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १२१ नुसार नमुना क्र.९० मध्ये ठेवण्यात आलेली नाही. तसेच वर्षाअखेर न्यायालय निहाय मागील वर्षातील प्रलंबित, चालू वर्षात नविन दाखल केलेल्या त्यापैकी अंतिम निकाल लागलेल्या अशाप्रकारे न. पा. ने दाखल केलेल्या व न. पा. विरुध्द दाखल केलेल्या दाव्यांचा गोषवारा काढणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे न. पा. च्या बाजुने व न. पा. च्या विरोधात लागलेल्या एकूण निकालानुसार केसेसचा गोषवारा काढणे तसेच न. पा. ने नियुक्त केलेल्या कायदे सल्लागारांकडे सोपविलेल्या केसेसची स्थिती दर्शविणारा गोषवारा काढणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केली नसल्याने न. पा. कडील प्रलंबित केसेस तसेच नियुक्त कायदे सल्लागारांची कामातील प्रगती इ. बाबत सद्यस्थिती समजून येत नाही. तरी वर नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करावी.

२) लेखा परीक्षण कालावधीतील निवड महिन्यातील वकिल फी व केसेस संबंधित इतर खर्चाच्या प्रमाणकांचे लेखा परीक्षण केले असता, खालीलप्रमाणे उणिवा आढळल्या.

प्र. क्र. २५५२ दि. ३१/३/११ र. रु.१०,०८०/-

सदर प्रमाणकान्वये श्री. फिलोरक्स मिडीया ॲडव्हर्टायझींग ॲन्ड कम्यु. कन्स. मुंबई यांचे विरुद्ध जाहिरात कर वसुलीसाठी दावा दाखल करणेबाबत खर्चाची रक्कम अदा करणेत आली आहे. परंतु प्रमाणकासोबत खर्चासंबंधित कोणतीही बिले जोडलेली नाहीत. तसेच प्रमाणकावर दावा क्र... नमूद केलेला नाही. संबंधित दाव्यासंबंधी कागदपत्रांची मागणी अर्धसमास पत्र क्र. ३ दि. २/३/१२ ने करूनही उपलब्ध झाले नाहीत. तसेच प्रमाणकात नमूद एकूण खर्चाची बेरीज रु.९,९८०/- असून रु.१०,०८०/- अदा करणेत आले आहेत. तरी जादा अदा रु.१००/- वसुलपात्र आहेत. तसेच उपरोक्त दाव्यासंबंधीत कागदपत्रे, खर्चाची बिले सादर करून खर्चाच्या योग्यतेबाबत खुलासा करावा. अथवा र. रु.९,९८०/- संबंधिताकडून वसूल करून न. पा. निधीत भरणा करावा.

२)	खालील प्रमाणकान्वये हाऊस टॅक्स अपिल इ. दाव्यांकरीता रु.१५०/- प्रती केस प्रमाणे ५०% वकिल फी व रु.१००/- प्रती केस नुसार खर्चाची रक्कम अदा केली आहे. परंतु न. पा. कायदे सल्लागारांची नियुक्ती व फी ठरविणेकामी सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९२० दि. १३/४/१० पाहता त्यात ५०% ॲडव्हान्स वकील फी देणेबाबत मंजुरी नाही. तसेच इतर खर्चाच्या पुष्ट्यर्थ त्याची बिले प्रमाणकासोबत जोडलेली नाहीत. तरी सदर उणिवा असताना प्रदान कशाचे आधारे करणेत आले याचा खुलासा करावा व संबंधित खर्चाची बिले सादर करून खर्च योग्य असल्याचे दाखवावे. अथवा सदर खर्चाची रक्कम संबंधितांकडून वसुल करावी.

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रुपये | ५०% वकिल फी रक्कम रुपये | बीले सादर न केलेल्या खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) २३९४ | २५/३/११ | ७,००० | ५,२५० | १,७५० |
| २) २३९३ | २५/३/११ | ९,६०० | ४,२०० | -- |

## मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(क) खालील आक्षेप

- निरंक -

# मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे

## कलम ९(ड) खालील आक्षेप

**३० :- नवीन निर्धारण सूची तयार करणे व करपात्र मूल्यामध्ये सुधारणा बाबत.**

परीक्षण कालावधीत सन २०१०-२०११ मध्ये नगरपरिषद सातारा यांनी सन २०१०-११ १४ या कालावधीची कर निर्धारण सूची तयार करून त्याप्रमाणे करदात्याकडून रक्कम वसुल . त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

रिषद सातारा यांनी म. न. प. अधिनियम १९६५ कलम ११५ अन्वये सन २००४-०५ ते अखेर कर निर्धारण यादी तयार करून त्याप्रमाणे कराच्या रक्कमा वसुल केल्या आहेत. मात्र धिनियम १९६५ कलम १२४ (२) अन्वये नविन निर्धारण सूची चार वर्षातून एकदा तयार क आहे. त्याप्रमाणे सन २००९-१० मध्ये वर्षाच्या ३१ जुलै २००९ पूर्वी प्रसिद्ध करणे ते. तथापी नगर परिषद सातारा यांनी सन २००९-१० मध्ये याबाबत कोणतीही कार्यवाही .

१३/८/१० रोजी मुख्याधिकारी नगर परिषद सातारा यांनी मा. जिल्हाधिकारी, सातारा यांना कर आकारणीस मुदतवाढ मिळणेबाबत पत्र पाठविले असून मा. जिल्हाधिकारी, सातारा /९/१० चे पत्रान्वये ३१ डिसेंबर १० पर्यंत चतुर्थ वार्षिक कर आकारणीस मुदतवाढ दिलेली णे सन २०१०-११ मध्ये कर निर्धारण सूची तयार केलेली आहे.

रिषद सातारा यांनी म.न. प. अधिनियम १९६५ कलम १२४(२) अन्वये नवीन कर निर्धारण ०९-१० मध्ये न केल्याने सोबत जोडलेल्या विवरण पत्राप्रमाणे रक्कम रुपये ३,४३,२७,२०९/ आलेले असल्याचे दिसून येते. त्याबाबत सोबत परिशिष्ट क्र. ३ जोडण्यात आलेले आहे.

**. ३१ :- फेर कर आकारणीवरील अपिलांबाबत.**

. पा. साताराची मालमत्ता कराची फेर कर आकारणी वर्ष २००४-०५ ते २००८-०९ साठी . ती वर्ष २००९-१० मध्ये होणे आवश्यक होते. तथापी न. पा. ने याबाबत मा. जिल्हाधिकारी चे क्षमापन घेऊन एक वर्ष उशिराने म्हणजे वर्ष २०१०-११ मध्ये फेर आकारणी केली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) आधीच एक वर्ष उशिराने झालेली फेर आकारणी वर्ष २०१०-११ मध्ये देखील करांची मागणी दि. २३/६/१० रोजी केली आहे. दुसरे बील दि. ७/२/११ ला गेले आहे. तदनंतर अपीले व अपीलांचा निर्णय होण्यास विलंब झाला आहे.

महाराष्ट्र न. पा. अधिनियम १९६५ कलम १११-अ अन्वये कर मागणी बीले दि.१ एप्रिल रोजी जाणे आवश्यक असताना उशिराने बीले का सादर करण्यात आली याचा खुलासा होणे आवश्यक वाटते.

२) बीले मुदतीत गेली असती, तर अपीलांची प्रक्रिया तेवढ्या कालावधीने अलीकडे आली असती तर न. पा. कडे निधीचा भरणा लवकर झाला असता, निधीचा भरणा उशिराने झाला असल्याने तेवढ्या रक्कमेवरील व्याजाचे नुकसान झाले आहे. असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

विलंबाचे कारणाचा खुलासा होणे आवश्यक वाटते.

**परिच्छेद क्र. ३२ :- बृहतपत्रकातील तफावतीबाबत - भविष्य निर्वाह निधी.**

नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम १३४(३) नुसार नमुना नं. १९ मध्ये बृहतपत्रक नोंदवही ठेवली आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी रक्कमेची कपातीची नोंद घेण्यात आली आहे. सदर बृहत नोंदवहीची दिनांक ३१/३/२०११ ची अखेर शिल्लक आणि बँक खाते आणि भविष्य निर्वाह निधी खात्यावर केलेली गुंतवणूक यांचा मेळ घेतला असता त्यात तफावत आढळून आली. ती खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बृहतपत्रकानुसार दि. ३१/३/११ ची शिल्लक | - | १,६५,५०,०९९ |
| २) | आय. डी. बी. आय. बँक अखेर शिल्लक | - | ४५,७०९ |
| ३) | कॅनरा बँक अखेर शिल्लक | - | ३१,०४,९५५ |
| ४) | दोन्ही बँकांतील एकूण शिल्लक | - | ३१,५०,६६४ |
| ५) | भ. नि. नि. रक्कमेची एकूण गुंतवणूक | - | ६४,६५,८५७ |
| ६) | बँक खात्यावरील शिल्लक व गुंतवणुक बेरीज | - | ९६,१६,५२१ |
| | बृहत पत्रकान्वये तफावत रक्कम रुपये | - | ६९,३३,५७८ |

वरीलप्रमाणे तफावत रकमेचा सकारण खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा. तफावतीची रक्कम नि.नि. खात्यावर भरणा करावी, तसेच बृहतपत्रकान्वये बँक खात्यावर शिल्लक राहील याची दक्षता घ्यावी.

**रिच्छेद क्र. ३३ :- आरोग्य विभागाकडील ठेक्याने दिलेल्या विविध कामांबाबत.**

आरोग्य विभाग न. पा. सातारा ने सन ०८-०९ मध्ये निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर ठेकेदारांना सन -१० मध्ये व लेखा परीक्षण कालावधी सन १०-११ मध्ये जनरल कौ. सभा ठ. क्र. १००८ दिनांक /६/१० अन्वये मुदतवाढ देणेत आली. याबाबतचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

सन १०-११ मधील एकूण खर्च

१) गटारे, नाले, इ. साफ करणे व निघणारा गाळ, कचरा इ.
न. पा. च्या कचराकुंडीत टाकणे.

२) रस्ते सफाई करणे कामी व भाजी मंडई — र. रु. १९,३९,५४३/-

३) सार्व. शौचालय, न. पा. च्या शाळा व इमारतींमधील
शौचालये व मुताऱ्या यांची दैनंदिन स्वच्छता करणे.

१) करारनाम्यातील अट क्र. ७ नुसार त्या त्या विभागातील संबंधित आरोग्य निरीक्षण यांचे दारावरील कामावर नियंत्रण राहील व मक्तेदार यांनी या संदर्भात कामाचा दैनंदिन अहवाल आरोग्य गाकडे द्यावयाचा असून अहवाल प्राप्त न झालेस त्या दिवसाचे बील अदा केले जाणार नाही. असे ताना मक्तेदाराकडील दैनंदिन अहवाल व सदर अहवालात मक्तेदाराने दर्शविलेले काम योग्य व समाधानकारक असलेबाबतचा त्या विभागातील आरोग्य निरीक्षक यांचा अहवाल घेतल्याचे आढळून आले नाही. तरी मक्तेदाराने सन १०-११ मध्ये दरमहा केलेली रकमेची मागणी योग्य असल्याचे आरोग्य निरीक्षक यांनी कशाचे आधारे निश्चित केले याबाबत खुलासा होऊन ठेकेदारांना केलेले प्रदान योग्य असल्याचे कागदोपत्री दाखवावे.

२) मक्ता क्र. ३ चे बाबतीत शौचालय सफाईकरीता जंतुनाशके आरोग्य विभागाकडून ठेकेदारास पुरविली जातात. सदर जंतुनाशकांची प्राप्त झाल्याची व त्याच्या दैनंदिन वापराच्या ठेकेदाराकडील नोंदी

आरोग्य विभागाने ठेकेदाराचे दैनंदिन अहवालाबरोबर घेणे आवश्यक असताना घेतलेल्या नसल्याने ठेकेदारास वाटप केलेल्या जंतूनाशकांचा वापर ठेकेदाराने योग्य रितीने केल्याची खात्री करता येत नाही.

सदर उणिवा पाहता आरोग्य विभागाचे मक्तेदारांचे कामावर कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसते. याबाबत मा. मुख्याधिकारी यांचे विशेष लक्ष वेधण्यात येत असून योग्य कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त उणिवांचे पूर्ततेअभावी एकूण खर्च र. रु.१९,३९,५४३/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

**परिच्छेद क्र. ३४ :- पाणी पुरवठा व अग्निशमन व्यवस्थापनाबाबत.**

न. प. क्षेत्रांत टंचाई काळात व खाजगी मागणीप्रमाणे पाणीपुरवठा करण्याकरीता खालील वाहनांचा वापर करण्यात येतो.

१) वाहन क्र. एमएच-११ जी-२०२२ (ट्रॅक्टर + लहान पाणी टँकर ट्रॉली)

२) एमएच-११ अेबी ८००४ - अग्निशमन वाहन

३) एमएच-११ जी-७०११ - अग्निशमन वाहन

सदरहू वाहनांद्वारे टंचाई काळात विनाशुल्क पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच खाजगी मागणी सशुल्क पुरविण्यात येते. सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार सन १०-११ मध्ये पाणीपुरवठा वाहनांद्वारे (ट्रॅक्टर) रु.७१,२९०=०० व अग्निशमन वाहनांद्वारे पा. पु. केलेल्या वाहनांद्वारे रु.१४,५६०=०० असे एकूण ८५,८५०=०० इतके उत्पन्न झाले आहे.

सोबतच्या प्रपत्र - २ नुसार एकूण ८८० ठिकाणच्या पाणीपुरवठा खेपानुसार सदर खेपांबाबत निशुल्क सेवा पुरविण्यात आलेली आहे किंवा याबाबत शुल्क आकारण्यात आलेले नाही. त्यामुळे न.प. चे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत खेपानिहाय योग्य ती परिगणना करून सदरबाबत योग्य ती कार्यवाही करून लेखापरीक्षणांत पुर्तता दर्शवावी.

नगरपरिषदेने पाणीपुरवठा व अग्निशमन व्यवस्थेबाबत योग्य ते निकष व व्यवस्थापन न केल्यामुळे स्थायी आदेश क्र. ३१ नुसार राज्यातील नगर परिषदांमध्ये अस्तित्वात असलेल्या अग्निशमन सेवा बळकट करण्याबाबत निर्देश आहेत.

ने अग्निशमन वाहने पाणी पुरवठ्याकरीता वापरल्याने शासन निर्देशानुसार न. प. स्थायी निर्देशानुसार कार्यवाहीत कमतरता दिसून येते.

स्थायी निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करून पूर्तता दाखवावी.

**:- ई-गव्हर्नंस अंतर्गत न. पा. वसुली व जन्म मृत्यु विभागाकडील नोंदी एन्ट्री करणेकामी निविदा मंजुरीतील त्रुटी व अपूर्ण कामाबाबत.**

प्रणाली सातारा न. पा. मध्ये ११ विभागास राबविणेबाबत विशेष सभा ठ. क्र. ८०७ अन्वये मंजूरी देणेत आली. त्यानुसार जाहीर निविदा प्रसिद्धीद्वारे निविदा मागविणेत येवून विदा ओॲसिस टेक्नॉलॉजिस्, उस्मानाबाद यांची असल्याने ठ. क्र.१०६१ दिनांक सार मंजूर करणेत येवून मुख्याधिकारी यांचे आदेश क्र. सानप/भांडार/१३१/दिनांक अन्वये कार्यादेश देणेत आला. याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

निविदा प्रसिद्धीद्वारे प्राप्त ३ निविदांचे तांत्रिक लिफाफे व त्यातील कागदपत्रे नस्तीत आढळून त्यामुळे तीनही निविदाधारक तांत्रिक बाबीस पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

यातील अट क्र. ५ नुसार ठेकेदाराने न. प. कडील २५ संगणकांवर २५ डेटा एन्ट्री काम मुदतीत पूर्ण करून द्यायचे आहे. अट क्र. ७ प्रमाणे कार्यादेश मिळाल्यापासून ३० आवश्यकता भासल्यास मुख्याधिकारी ठरवतील त्याप्रमाणे काम पूर्ण करावयाचे आहे. परंतु व जन्म मृत्यु विभागातील नोंदवहीनुसार डेटा एन्ट्रीची प्रत्यक्ष सुरुवात दि.२७/६/११ दिसते. मुख्याधिकारी यांनी ठेकेदारास काम पूर्ण करण्याच्या मुदतीबाबत स्वतंत्र आदेश त्यामुळे ठेकेदाराने ३० दिवसाचे आंतच काम पूर्ण करणे आवश्यक होते. तसेच ठेकेदाराकडील टर्सची संख्या नोंदवहीनुसार ६ ते ९ असल्याचे दिसते.

प्रमाणे कार्यादेशानुसार वसुली विभागाकडील नोंदी पूर्ण झाल्या असून जन्म, मृत्यु अनुक्रमे ४ लाख व ३ लाख नोंदी पूर्ण करणे आवश्यक असताना सदर ठेकेदाराने जन्माच्या मृत्युच्या ४,३२८ अशा एकूण २८,६६५ नोंदी पूर्ण केल्या असून अनुक्रमे २,९६,११६ व नोंदी (एन्ट्रीज) करणे शिल्लक आहे. यावरून ठेकेदाराने विलंबाने काम सुरू करून अद्याप

पूर्ण केले नसल्याचे दिसते. तसेच ऑपरेटर्सची संख्या देखील करारनाम्याप्रमाणे नसून कमी आहे. ठेकेदाराने करारनाम्यातील अटी-शर्तींचा भंग केल्याने वेळेत काम सुरू केले नसतांनाच सदर कार्यादेश रद्द करून दुसऱ्या क्रमांकाच्या न्युनतम दराच्या ठेकेदारास पहिल्या न्युनतम दराने काम करण्याबाबत विचारणा अथवा वाटाघाटी करणे किंवा फेर निविदा मागविण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते. अशी कार्यवाही न. पा. ने वेळेत न केल्याने न. पा. कडील नोंदींचे संगणकीकरण होण्यास विलंब होवून संबंधित ठेकेदारास अद्याप प्रदान केले नसले तरी यापुढे निविदा दर वाढलेले असल्यास आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे. तसेच सदर ठेकेदारास दिलेल्या कार्यादेशात व करारनाम्यात विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही नमुद न केलेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

ठेकेदाराने काम अपूर्ण ठेवल्याने न. पा. साताराने ठेकेदाराकडील (साताऱ्यातील) डेटा एन्ट्री ऑपरेटर्सशी चर्चा करून त्याच दराने करण्यास तयार असल्याने पुढील एकूण ६,७९५ एन्ट्रीज त्यांचेकडून करून घेतल्या. सदर ऑपरेटर्सनी प्रती एन्ट्री ०.८० पैसे मंजूर दरात ०.२० पैसे वाढ करून रु.१/– प्रमाणे मागणी केल्याने सदर वाढ मंजूर केल्याचे दिसले. उर्वरित डेटा एन्ट्रीच्या कामाकरीत पुनश्च त्वरित निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असताना अशाप्रकारे काम करून घेऊन नंतर वाढीव दरास मान्यता कशाचे आधारे दिली याचा खुलासा होणे आवश्यक असून अशाप्रकारे कोणतीही प्रक्रिया नियमानुसार न अवलंबिता काम करून वाढीव दरास मंजूरी देणे. लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही. सदर डेटा एन्ट्रीचे काम विहित मुदतीत त्याच आर्थिक वर्षात प्रदानासह पूर्ण न झाल्याने अंदाजपत्रकीय तरतूद वाया गेली आहे. तरी याबाबत त्वरीत निविदा प्रक्रिया करून होणाऱ्या नुकसानीच्या निश्चितीबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. ३६ :- न. प. साताराकडील यु. पी. एस. दुरुस्ती व नवीन बॅटऱ्या खरेदीच्या निविदा प्रक्रियेतील त्रुटींबाबत.**

न. पा. साताऱ्याकडील नागरी सुविधा केंद्र व सर्व्हर रुमपासून सर्व विभागात लॅन नेटवर्किंग, न. प. कडील ७ के. व्ही. ए. चे २ ऑन लाईन युपीएस दुरुस्त करून त्यासाठी नवीन बॅटऱ्या खरेदी करणे इ. कामाकरीता (अंदाजपत्रकीय तरतूद ८ लाख) सर्व. सभा ठ. क्र. १०३६ दि. २५/८/१० अन्वये मंजूरी देणेत येऊन तीनही कामांकरीता जाहीर निविदा प्रसिद्धीद्वारे एकत्रित निविदा मागविणेत आल्या.

त्यापैकी सिध्दि डिस्ट्रीब्युटर्स या कमी दराच्या निविदेस मान्यता देऊन जा. क्र. १२४ दि.१४/१२/१० अन्वये कामाचे आदेश देणेत आले. यापैकी २ नग यु.पी.एस. दुरुस्तीवर प्र. क्र. २६६० दि.३१/३/११ रु.७२,०००/- खर्च करणेत आला असून उर्वरित काम पुढील आर्थिक वर्षात करण्यात आले आहे. सदर झालेल्या खर्च व निविदा प्रक्रियेबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

१) न. प. कडील ७ के. व्ही. ए. च्या २ ऑन लाईन यु. पी. एस. व त्याच्या जुन्या बॅटरींची तपासणी न. पा. कडील विद्युत विभागाने करून त्याबाबत अहवाल देणे आवश्यक असताना सुपर सेल्स कॉर्पो. सातारा यांनी दि. १०/४/०८ रोजी केलेल्या तपासणी अहवालाचे आधारे यु.पी.एस. दुरुस्ती व त्यासाठी नवीन बॅटरी खरेदी प्रस्तावित करण्यात आली आहे.

२) म.-शा. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र. भांखस १०९४/(२६७९) उद्योग-६ दिनांक ३०/३/९४ नुसार तांत्रिकदृष्ट्या प्रकृष्ट वस्तूंची खरेदी दोन लिफाफे पद्धतीने करणे आवश्यक असताना तांत्रिक निविदेचा लिफाफा मागविण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

त्याचप्रमाणे प्राप्त ३ निविदांपैकी संबंधित निविदाधारकांचे नोंदणी दाखल्यानुसार सिध्दि डिस्ट्रीब्युटर्स व आयडीयल एजन्सीजचे व्यवसायचे स्वरूप अनुक्रमे स्टेशनरी, लाकडी, लोखंडी साहित्य विक्री व पेन व स्टेशनरी होलसेल विक्री असे असताना व तांत्रिक निविदा न मागविल्याने सदर निविदाधारकांना सदर कामाबाबतचा पुर्वानुभव इ. ची कागदोपत्री खात्री न करताच सदर निविदा कशाचे आधारे पात्र ठरविणेत आल्या याचा खुलासा होणे आवश्यक आहे. उपरोक्त उणिवा पाहता निविदा प्रक्रिया व पुरवठादाराची निवड शासन निर्णयानुसार योग्य प्रकारे केलेली नाही.

३) तीनही कामांकरीता एकत्रित निविदा मंजूर केली असतांना कार्यादेश दि.१४/२/११ रोजी स्वतंत्र कामनिहाय दिल्याने नवीन बॅटरी खरेदी व लॅन नेटवर्किंगचा खर्च पुढील आर्थिक वर्षात पडलेला आहे. सदर कामावर ८ लाख अंदाजपत्रकीय तरतूद असताना केवळ रु.७२,०००/- खर्च सन १०/११ मध्ये पडल्याने उर्वरित तरतूदीची रकम त्या आर्थिक वर्षात नाहक गुंतून पडल्याने वाया गेली आहे. तरी कामनिहाय स्वतंत्र कार्यादेश दिल्याबाबत खुलासा करावा.

४) ठ. क्र. १०९४ दि. १४/१२/१० अन्वये झालेले काम योग्य असल्याचा तज्ज्ञ समितीचा अहवाल न घेता प्रदान केल्याबाबत खुलासा करावा.

उपरोक्त बाबींची पूर्तता होईपर्यंत र. रु.७२,०००/– आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

**परिच्छेद क्र. ३७ :- महिला व बाल कल्याण योजनेतून केलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत.**

लेखा परीक्षण कालावधीत सन १०–११ मध्ये नगर परिषदेने प्रमाणक क्रमांक १२४७ दिनांक २२/१०/१० ने रु.१६,८००/– महिला व बालकल्याण सभापती कक्षामध्ये फर्निचर व खुर्च्या खरेदी केल्या आहेत.

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००५/प्र. क्र. १५६/०५/नवि–२० मंत्रालय मुंबई दि. ३० डिसेंबर २००६ नुसार उपरोक्त बाबींवर खर्च करता येत नाही. त्यामुळे खर्च रक्कम रु.१६,८००/– लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही. तसेच उपरोक्त शासन निर्णयात मान्य केलेल्या योजनां व्यतिरिक्त बाबींवर खर्च करावयाचा असल्यास मा. आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**परिच्छेद क्र. ३८ :- रोखपालाकडे जमा होणाऱ्या दैनंदिन हाताळणी रक्कमेचा विमा उतरविणेबाबत.**

रोखपालाकडे न. पा. च्या वेगवेगळ्या विभागामार्फत दैनंदिन जमा होणारी रक्कम जमा चलनाने न. पा. च्या नावे बँकेत भरणा केली जाते. (म. न. पा.लेखा संहिता १९७१ मधील नियम ४१ प्रमाणे) यासाठी हाताळणी योग्य रक्कमेच्या कमाल मर्यादेपर्यंतच्या रक्कमेची ट्राझीट विमा (इन्शुरन्स) उतरविणे आवश्यक आहे. सदर विम्यामुळे न. पा. कार्यालयापासून बँकेत भरणा करणेपर्यंतच्या वेळेमध्ये संबंधीत रक्कमेस विमा संरक्षण मिळून न. पा. च्या निधीचे संरक्षण होणेस सुलभ होईल. त्यामुळे विमा उतरविणे आवश्यक आहे. असे लेखा परीक्षणाचे अभिप्राय आहेत.

**परिच्छेद क्र. ३९ :- पालिका सदस्यांकडील कराच्या थकबाकीबाबत.**

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नियम ४५ अन्वये ज्या पालिका सदस्यांनी नगरपालिकेचा कोणताही कर भरा नसेल, कराच्या देय तारखेपासून ते थकबाकीदार असतील, त्यांनी देय तारखेपासून दोन महिन्यांच्या आत कराची रक्कम भरणा करणे अनिवार्य आहे.

अशा थकबाकीदार पालिका सदस्यांची यादी तयार करून दिनांक १५ एप्रिल, १५ जुलै, १५ ऑक्टोबर व १५ जानेवारी रोजी मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली पाहिजे. तद्नुसार अधिनियमांन्वये कारवाई करून जिल्हाधिकारी अशा थकबाकीदार पालिका सदस्यांना अनर्हता ठरविण्या बाबत आदेश काढतील, अशी तरतूद आहे.

तथापी, सातारा नगरपालिकेने थकबाकीदार पालिका सदस्यांचीयादी जिल्हाधिकारी यांना पाठविलेली नाही. सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार पालिका सदस्यांनी त्यांच्याकडील करांची थकबाकी विलंबाने भरली आहे. उशिराच्या कालावधीच्या व्याजाचे नुकसान झाले आहे. वरीलप्रमाणे विवरणपत्र पाठविले असते तर पालिकेचे नुकसान टाळता आले असते. आता नवीन पालिका सदस्यांच्या बाबत अशी अनियमितता राहणार नाही याची दक्षता घ्यावी. (परि. क्र. ३ अ)

**परिच्छेद क्र. ४० :- इमारत गाळे भाडे वसूली / थकबाकी आदीबाबत.**

न. पा. स्थावर जिंदगी विभागाने न. प. मालकीच्या इमारती / गाळे / जागा आदींबाबत वसुली-मागणी-थकबाकी इ. बाबत नोंदवह्या ठेवलेल्या आहेत. संबंधित नोंदवहीमधील सर्व रकाने परिपूर्ण नसल्याने संबंधित गाळा/जागा कोणत्या दिनांकापासून भाड्याने दिल्या आहेत याबाबत नोंदवहीवरून बोध होत नाही.

सोबतच्या पत्रक अ प्रमाणे न. प. मालकीच्या गाळा / जागा यांच्याकडील सन २०१०-११ अखेर एकूण १,३०,१५,६०८=०० (रुपये एक कोटी तीन लाख पंधरा हजार सहाशे आठ फक्त) इतक्या मोठ्या प्रमाणात थकबाकी दिसून येते. यावरून न. प. ची भाडे वसुलीबाबत भूमिका उदासिन असल्याचे दिसते. वसुलीबाबत योग्य ती कार्यवाही करून प. प. चे नुकसान टाळण्याकरीता योग्य त्या उपाययोजना राबविणेबाबत कार्यवाही करून पुर्तता करावी. (परिशिष्ट क्र. ४)

**परिशिष्ट क्र. ४१ :- शिक्षण कर व रोजगार कर कमी / जादा भरणेबाबत.**

महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम १९६२ नुसार महाराष्ट्र शासनाने न.पा. च्या हद्दीमधील इमारतींवर शिक्षण व रोजगार हमी उपकर हे बसविलेले आहेत. ते वसुल करून शासकीय कोषागारात विहित कालावधीत भरण्याची जबाबदारी न. पा. ची आहे.

सन २०१०-११ मध्ये खालीलप्रमाणे उपरोक्त दोन्ही कराची वसुली भरणा करण्यात आली असल्याने जमा व खर्च खतावणीवरून दिसते.

| जमा | रिबीट | भरणे आवश्यक | भरणा | कमी | जादा |
|---|---|---|---|---|---|
| १९८२५३४५/- | २९६५०६/- | १९४२८८३९/- | १९८५८२९०/- | - | ४२९४५१/- |

र. रुपये ४,२९,४५१/- जादा भरणा रक्कमेचे पुढील वर्षात समायोजन करण्यात यावे. (परि. क्र. ४ अ)

**परिच्छेद क्र. ४२ :- जमा पावती पुस्तकांबाबत.**

महा. नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम ९ अन्वये नगरपरिषदेने उपयोगासाठी ठेवलेली सर्व जमा पावतीपुस्तके, परवाना नमुने ह्यांचा हिशेब नमुना क्र. १ मध्ये ठेवला पाहिजे. सदर नोंदवही उपलब्ध झाली नाही. सदर पावती पुस्तकांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) अधिकृत अधिकाऱ्याने पावती पुस्तकांतील जमा पावत्यांची संख्या तपासून पुस्तकाच्या शेवटच्या पानावर पावत्या प्रमाणित केल्याची स्वाक्षरी केली पाहिजे. तशी कार्यवाही केलेली नाही.

२) पावती पुस्तकाचा वापर वसुली लिपिकाने पूर्णपणे केल्यावर ते अधिकृत अधिकाऱ्याकडे परत केले पाहिजे. पुस्तक परत केल्याशिवाय नवीन पुस्तक वसुली लिपिकांना देण्यात येवू नये. तथापी पावती पुस्तकांची मागणी व पुरवठा नोंदवही ठेवली नसल्याने वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

३) पूर्णत: वापरलेली पावती पुस्तके वसुली लिपिकाने परत केल्यावर खातेप्रमुखांनी अथवा मुख्याधिकारी यांनी मूळ पावत्यांची तपासणी करावी व एखादी पावती काढून घेतली नाही याची खात्री करावी. व खात्री केल्याबाबत शेवटच्या पृष्ठावर प्रमाणपत्र द्यावे. तथापी अशी कार्यवाही झालेली नाही.

४) पावती पुस्तकामध्ये झालेली खाडाखोड उपरीलेखन खातेप्रमुखांनी तपासणी करून खात्री करावी. वापरून झालेली पावतीपुस्तके वसुली अधिकारी यांनी स्वत:च्या व्यक्तिगत ताब्यात ठेवण्याची आहेत, तशी ती ठेवलेली नाहीत.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत दक्षता घेण्यात येवून पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४३ :- चलन पडताळणीबाबत.**

महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम क्र. ९८(२)(५) नुसार शासकीय रक्कमांचा भरणा चलनाद्वारे बँकेत भरण्यात येईल तेव्हा कार्यालय प्रमुखाने भरणा संबंधीत रक्कमा खरोखरच जमा करण्यात आल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने महिना झाल्यावर त्या महिन्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या सर्व रक्कमांची कोषागारातून पडताळणी करण्यात आली पाहिजे. तरी अशी नियमानुसार कार्यवाही होत नाही. या नियमबाह्यतेबाबत साधार खुलासा करून सन २०१०-११ मध्ये शासनास भरणा केलेल्या रक्कमा योग्य असल्याची पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४४ :- कराची वाढ वसुल (जादा वसुल) रक्कमेबाबत.**

कर विभागाचे सन २०१०-११ चे लेखा परीक्षण करताना वसुल नोंदवही व मागणी नोंदवहीनुसार रु.८,५१,८६३/- वाढ कर वसुली नोंदविली आहे. सदर वाढ रक्कम संबंधीताने मागणी केल्यास परत/ समायोजित केली जाते. सदर रक्कम ही फक्त १०-११ ची असून दि.३१/३/१० अखेर किती वाढ वसूल रक्कम आहे याबाबत स्वतंत्र नोंदवही न ठेवल्याने समजुन येत नाही.

सदर रक्कम देय असल्याने दायित्व सदरी नोंद करणे आवश्यक असताना ती रक्कम दायित्व सदरी नमूद केलेली नाही. तरी देय रक्कम किती आहे? याबाबत शहनिशा करून दायित्व सदरी रक्कम नमूद करून पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४५ :- जागतिक महिला दिना निमित्त केलेल्या खर्चाबाबत.**

प्रमाणक क्र. २१२१ दि. ३/३/११ र. रु.८०,०००/-

म. बा. क. समिती ठराव क्र. ११७ दि. ११/१/११ ने मंजूरी.

जागतिक महिला दिनानिमित्त श्रीम. केतकी कुलकर्णी यांच्या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे -

१) जागतिक महिला दिनानिमित्त श्रीम. केतकी कुलकर्णी यांना रु.८०,०००/- मानधन हे कोणत्या निकषा द्वारे ठरविण्यात आले.

२) सदर कार्यक्रमाचा कालावधी किती वेळाचा/ तासाचा व यामध्ये किती गाण्यांचा समावेश आहे याबाबत सविस्तर अहवाल पत्रिका मान्य करून न घेताच कार्यक्रम यशस्वी व चांगला झालेचे प्रमाणित न करताच संबंधितांना रक्कम कोणत्या आधारे देण्यात आली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

३) श्रीम. केतकी कुलकर्णी यांना धनादेश क्रमांक ९७२२८८ दि. ३/३/११ (युको बँक) ने आदा केला आहे. मात्र सदर संस्थेची आयकर कपात नियम १९४ (सी) केलेली नाही. तसेच करमणुक कर नियमानुसार कपात करून शासनास भरणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

४) अशा प्रकारचे कार्यक्रम करणाऱ्या इतर संस्थांचे कोटेशन न मागवता श्रीम. केतकी कुलकर्णी यांना हा कार्यक्रम दिल्याने तुलनात्मक फायद्याला न. पा. स मुकावे लागले आहे.

५) संबंधीत संस्थेचे कार्यक्रमाचे मानधनाचे बील / क्रेडीट किंवा कॅश मेमो घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अशी प्रमाणका शिवाय आदाई ही नियमबाह्य ठरते.

महाराष्ट्र न. पा. लेखा संहिता १९७१ ची नियम १०, १३, १६ अन्वये नियमबाह्य ठरते. उपरोक्त नमुद प्रमाणक उपलब्ध करून पुर्तता दाखवावी. अन्यथा रक्कम रु.८०,०००/- संबंधीतांकडून वसूल करून पुर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ४६ - स्टेशनरी खरेदीबाबत.**

प्रमाणक क्र. २४२ दि.३/६/१० रक्कम रु.३०,०००=००

पुरवठादार - मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, सातारा.

उपरोक्त प्रमाणकान्वये न. प. ने. सन २०१०-११ च्या ऑफिस दैनंदिनी (डायरी) छपाई करणेकरीता खर्च करण्यात आला आहे, तसेच सन २०१०-११ मध्ये स्टेशनरी खरेदीकामी न. प. ने एकूण २,३३,३१०=०० इतका खर्च केलेला आहे. सदर खरेदी विविध पुरवठादार / एजन्सीद्वारे केलेली आहे.

शासन निर्णय दि. २/१/१९९२ मधील खरेदी विषय तरतुदींनुसार विशिष्ट वस्तुंची वार्षिक खरेदी रु.५०,०००=०० किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास निविदा मागविणे बंधनकारक असून न. प. सातारा यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

तसेच खाजगी पुरवठादारांकडून (वस्तूंची खरेदी) स्टेशनरी खरेदी करण्यापूर्वी लेखन सामग्री संचालनालय / विभागाशी कोणताही पत्रव्यवहार न. प. ने. केलेला नाही.

स्टेशनरी बाबत न. प. ने केलेली खरेदी कोणत्या नियमांना अधिन राहून केली याबाबत लेखापरीक्षणांस पुर्तता करावी. तोपर्यंत झालेला एकूण खर्च रु.२,३३,३१०=०० आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ४७ :- निविदा नमुन्याची विक्री किंमती बाबत.**

सातारा नगरपरिषदने सन २०१०-११ मध्ये विविध बांधकामासाठी निविदा नमुन्यांची विक्री करून विक्रीपोटी प्राप्त रक्कम न. प. निधीत जमा केलेली आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

अ) शा. नि. क्र. नप्रस/निविदा मागविणे/०५/प्र.क्र.१५१/०५/९ दि. २९/१२/०५ परिशिष्ट-ब मधील निविदा नमुन्याचे शुल्क आकारणीसाठी किंमती निश्चित केलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा पत्राची विक्री किंमत |
|---|---|---|
| १. | रु.१०,०००/- पर्यंत | ५० |
| २. | रु.१००००/- ते १०००००/- पर्यंत | १०० |
| ३. | रु.१०००००/- ते ५००००/- पर्यंत | ५०० |
| ४. | रु.५०००००/- ते १००००००/- पर्यंत | १००० |
| ५. | रु.१०,००,०००/- पेक्षा जास्त | १५०० |

नगरपरिषदेने वित्तीय वर्षात वसूल केलेल्या निविदा नमुन्याच्या किंमती वरील शा. निर्णया प्रमाणे असल्या विषयी नोंदवहीत नोंदी न घेतल्यामुळे खात्री करता आली नाही. तशी खात्री पटवावी व यापुढे उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाहीकरून पुर्तता दाखवावी.

म. न. प. लेखा संहिता १९७१ च्या नियम १५०(१) नुसार विविध नमुने विक्रीबाबत नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे लेखा परीक्षण वर्षात विविध कामांसाठी न. प. ने किती निविदा नमुने छापले त्यापैकी किती निविदा नमुन्यांची विक्री करण्यात आली व लेखापरीक्षण कालावधी अखेर किती

निविदा नमुने शिल्लक राहिले याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही. सदर नोंदवही ठेवून पूर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४८ :- टोपेमामा दत्त मंदिर ते श्री ढोल्या गणपती ते आदालत वाडा रस्ता डांबरीकरण करणे तसेच रस्त्यालगत संरक्षक भिंत बांधणे व गटर बांधणे (मा. खासदार निधी)**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.९,५०,५००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | क्र. नियोजन/खा.स्था.वि.का./०९-१०/अंप/का-४/२७ दि.९/१२/०९ |
| तांत्रिक मान्यता | : | एमपीपी/साबा/२८२२/ दि.२२/१०/०९. |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. तृप्तेश अर्जुन कदम |
| कामाचे आदेश | : | साबवी/९२० दि. २०/२/१० |
| कामाची मुदत | : | ९० दिवस काम सुरू दि. २०/२/१० काम अपूर्ण |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५३ पान क्र. २२ ते २४ |
| लेखाशिर्ष | : | मा. खासदार स्थानिक विकास |
| करारपत्र | : | दि. २२/२/२०१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.३०,२९१/- सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.२४,२३३ आयकर रु.६,०५८/- रॉयल्टी रु.१३,१४७ विमा - |
| झालेला खर्च | : | प्र. क्र. १९७६ दि. १४/२/११ र.रु.५,२५,४२५/- |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर कामाच्या प्रमाणकासोबत काम पुर्णत्वाचा दाखला नाही. यावरून ३१/३/११ अखेर काम अपूर्ण आहे.

२) मोजमाप पुस्तक क्रमांक ५३ हे मा. मुख्याधिकारी यांनी (प्रमाणित) बांधलेली नाही.

३) उपरोक्त प्रमाणकातील अंशतः प्रदान प्रमाणक क्र.१८४५ दि.२०/१/११ ने रु.२,२५,४२५/- आदा केली आहे. मात्र संबंधीत मक्तेदाराची रक्कम मिळालेबाबत पोहोच नाही.

४) मा. जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दि. ९/१२/०९ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार सदर काम मंजुरीच्यादिनांकापासून एक वर्षाच्या आत पुर्ण करणे बंधनकारक आहे. उपरोक्त प्रमाणकान्वये प्रथम धावते देयक आदा केले आहे. सदर काम दि. ३१/३/११ अखेर अपूर्ण असलेने संबंधित मक्तेदारावर मुदतीत काम पूर्ण न केल्याने कोणती दंडात्मक कार्यवाही केली. याबाबत लेखापरीक्षणास पुर्तता सादर करावी.

काम पूर्ण करेपर्यंत खर्च रक्कम रु.५,२५,४२५/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. ४९ :- वार्ड क्र. २० पेठ चिमणपूरा इनामदार घर ते भिडे घर अखेर पेव्हींग ब्लॉक बसविणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.९०,८७५/- |
| प्रशासकीय मान्यता | : | ठ. क्र. १९७३ दि. २१/४/१० |
| तांत्रिक मान्यता | : | जा. क्र. चिशा/तां.म./५३१/१० मजिप्रा.बांध.वि. सातारा दि. २४/२/१० |
| मक्मतेदाराचे नाव | : | श्री. राजू बबन पाटील |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/६७ दि.२२/४/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस. काम सुरू २४/४/१० काम पूर्ण २६/४/१० |
| मोजमाप पुस्तक | : | १५ पान क्र. २०० |
| लेखाशिर्ष | : | रस्ते |
| करारपत्र | : | रु.३००/- |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.४५६३ व्हॅट रु.३७३० आयकर रु.२०५२ रॉयल्टी रु.१२० |
| झालेला खर्च | : | प्र. क्र. ६९९ दि.२२/७/१० रक्कम रु.८२,६९३/- |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१)  सदर कामाकरीता दै. ऐक्य वर्तमानपत्रात दि. २१/२/१० रोजी जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध केली असून प्रारंभ दिनांक ८/३/१० दिली आहे.

शासन निर्णय २/१/९२ - ४/२/०३ तसेच स्थायी आदेश क्र. ३६ मध्ये नमूद केल्यानुसार निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर पुरवठादारास निविदा भरण्यासाठी कमीत कमी तीन आठवड्यांचा कालावधी देणे बंधनकारक असताना न. प. ने कमी मुदतीची निविदा मागविली आहे.

२)  म. न. प. अधिनियम १९६५ कलम ७२ अन्वये कोणत्याही कामाची निविदा प्रसिद्धी करण्यापूर्वी संबंधीत कामास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मंजूरी घेणे बंधनकारक असताना सदर काम तांत्रिक मंजूरी आदेशा शिवाय केले असून याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन घेवून पुर्तता दाखवावी.

३)  लेखासंहिता नियम १७७ नुसार मुख्याधिकारी यांनी नमुना नं. १३३ स्वाक्षरीत करावयाचा आहे. तथापी न. नं. १३३ स्वाक्षरीत केलला नाही. काम पूर्ण झालेबद्दलचे प्रमाणपत्र दिले नसताना अंतिम बील मक्तेदारास कशाचे आधारे अदा केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तोपर्यंत रक्कम रुपये ८२,६९३/- लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ५० :- वॉर्ड क्र. २१ पेठ मंगळवार सि.स.नं. १५ येथील दिक्षित घर ते जाधव घर अखेर चेंबर बांधणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.२१,१३०/- |
| प्रशासकीय मान्यता | : | ठराव क्र. १७०० दि. २७/७/०९ |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. विशाल विकास कुलकर्णी |
| कामाचे आदेश | : | जा. क्र./सानप/सां.बा./१०४५ दि.१९/३/१० |
| कामाची मुदत | : | ३० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ३८ पान क्र. १३६ |
| करारपत्र | : | रु.२००/- दिनांक नमूद नाही. |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.१०८१ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.८६५<br>आयकर रु.४३३ विमा - रॉयल्टी रु.२५० |

झालेला खर्च : प्र. क्र. ५०८ दि.३/७/१० रक्कम रु.२१,६२८/-

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) दिनांक २/१/२०१० च्या दैनिक सांजवातमध्ये जा. क्र. ८४८ दि. १३/१२/०९ ने जाहीर निविदा दिली आहे. त्यामध्ये मक्मतेदारांकडून दिनांक १३/१/१० अखेर दर मागविणेत आले होते. त्याप्रमाणे सदर कामाकरिता एकूण ३ निविदा आल्या. त्यामधील श्री. विशाल विलास कुलकर्णी यांचे दरास दिनांक ८/३/२०१० रोजी मंजूरी देणऐत आली आहे. तसेच करारपत्र व कामाचा आदेश हा दिनांक १९/३/१० रोजी देण्यात आला आहे. जाहीर निविदामधील दर मागविण्यात आलेला दिनांक व वर्क ऑर्डर / करारपत्र व दर मंजूरी यांच्यामधील दिनांकामध्ये विलंब दिसून येत आहे.

२) न. नं. १३३ वर काम पूर्ण झाल्याबाबतच्या प्रमाणपत्रावर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

**परिच्छेद क्र.५१ :- वॉर्ड क्र. २१ पेठ रामाचा गोट सि. स. नं. २६१ सायगावकर घर ते सि.स.नं. २४७ चोरगे घर व ३१७ कुरेशी घर ते चोरगे घर अखेर पाईप ड्रेन करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१,०४,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | स्थायी समिती ठराव क्र. ११२८ दि. २५/३/१० |
| तांत्रिक मान्यता | : | जा.क्र./चिशा/तां.मं./२२१३/१० दि.२१/५/१० |
| मक्मतेदाराचे नाव | : | श्री. मधुकर ज्ञानदेव शिंदे |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. ५८७ दिनांक १८/९/१० |
| कामाची मुदत | : | ९० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ३८ पान क्र. १९१ ते १९३ |
| लेखाशिर्ष | : | गटारे / पाईप ड्रेनेज |
| करारपत्र | : | रु. ३५०/- |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.५३०५/- सेलटॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.४२४४/- आयकर रु.१०६१/- विमा रु.१०६१ रॉयल्टी ४२५/- |
| झालेला खर्च | : | प्रमाणक क्र. १९८५ दि.१४/२/११ रक्कम रु.१,०६,१०५/- |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) उपरोक्त कामास व अंदाजपत्रक रक्कम रुपये १,०४,०००/- चे खर्चास तसेच सदरचे काम श्री.अमृत बळवंत शिंदे यांचेकडून करून घेण्याचा ठराव स्थायी समितीने ठराव क्र.११२८ दिनांक २५/३/१० ने वार्षिक मंजूर दरामध्ये करून घेणेस मंजूरी देणेत येत आहे असे सर्वानुमते ठरले असताना . दैनिक ग्रामोद्धार दिनांक १/६/२०१० च्या पेपरमध्ये जाहीर निविदा सूचना देवून निविदा मागविण्यात आल्या आहेत. जाहीर निविदा प्रसिद्ध करणेस व दर मंजूरी करण्यास मे. स्थायी समिती ठराव क्रमांक १३४१ दिनांक ३/९/२०१० ने कार्योत्तर मंजूरी देण्यातआली आहे. कार्योत्तर मंजूरी देता येत नसताना कार्योत्तर मंजूरी कशी दिली. सदरच्या अनियमिततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२) सदर कामाची जाहीर निविदा सूचना दै. ग्रामोद्धारमध्ये दि. १/६/२०१० रोजी प्रसिद्ध करण्यात आली. निविदेमध्ये प्राप्मत निविदा २८/६/१० अखेर स्विकारून शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता हजर मक्तेदारांसमोर मुख्याधिकारी यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील असे स्पष्ट नमूद असताना प्राप्त तीनही निविदा दिनांक ३०/६/१० रोजी मुख्याधिकारी यांचेसमोर विलंबाने उघडण्यात येवून कार्यादेश दि. १८/९/१० रोजी देण्यात आला. तरी विलंबाबाबत खुलासा करावा.

३) कमी दराची ४.९९% जादा दराची श्री. मधुकर ज्ञानदेव शिंदे यांची निविदा नमुना 'बी' पान नं.४ वर नगर अभियंता यांची सही नाही. तसेच निविदांच्या प्रत्येक पानावर मुख्याधिकारी, मक्तेदार यांच्या सह्या नाहीत.

४) काम पूर्णत्वाचे दाखल्यावर मुख्याधिकारी यांची सही नाही.

**परिच्छेद क्र. ५२ :- शिवम कॉलनी येथील जुना पूल पाडून नवीन पूल बांधणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.११,००,००० व सुधारीत र. रु.१३,००,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | स्थायी समिती ठ. क्र. १७८ दि.१४/८/२००७ |
| तांत्रिक मान्यता | : | का.अ. मजिप्रा, सातारा यांचे जा. क्र. ३२४१ दि.६/२/०९ व २६५९ दि. १९/७/१० |
| मक्मतेदार | : | श्री. तृप्तेश अर्जुन कदम |

कार्यारंभ आदेश : जा. क्र. सानप/सांबा/८९८/ दि. १४/१/२०१०

कामाची मुदत : ९० दिवस

मोजमाप पुस्तक : क्र. ३३ पान क्र. १६३ ते १६८

करारपत्र : रु.२,७५०/- दि. २४/१/२०१०

वजाती : प्रथम देयकातील सुरक्षा ठेव रु.४९,८३६

सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.३९,८६९ आयकर रु.२१,९२७

रॉयल्टी रु.१४,४१७ विमा -

झालेला खर्च :

| प्र. क्र. | दिनांक | रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|
| २२० | २६/५/१० | २,००,००० | (९९६७२१) | प्रथम देयक पार्ट पेमेंट |
| ७०४ | २२/७/१० | ३,००,००० | | प्रथम देयक पार्ट पेमेंट |
| ९९५ | ४/९/१० | ४,९६,७२१ | | प्रथम देयक उर्वरीत पेमेंट |
| १५१६ | १९/१२/१० | २,००,००० | (३१९१६२) | दुसरे व अंतिम देयक पार्ट पेमेंट |
| १८२७ | १९/१/११ | १,१९,१६२ | | दुसरे व अंतिम देयक उर्वरीत पेमेंट |
| | | १३,१५,८८३ | | |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर कामाची जाहीर निविदा नोटीस जा. क्र. ५६२ दि. ३१/१०/०९ ही दैनिक ऐक्य दिनांक १/११/०९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून त्याची मुदत दिनांक १३/११/०९ अखेर दुपारी ४ वाजेपर्यंत आहे. मात्र महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार शासन निर्णय क्र. भांखस-१०८८/२५१२ दि. २/१/९२ कलम ८.३ अ प्रमाणे निविदेस कमीत कमी ३ आठवड्यांची मुदत देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच अल्प कालावधीची निविदा प्रसिद्ध करण्याबाबत कारणे नमूद केलेली दप्तरी नाहीत.

२) सदर कामाचे आर. सी. सी. डिझाईन दप्तरी नाही. त्यामुळे स्टॅंडर्ड स्पेसिफिकेशनप्रमाणे स्टील वापरले किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही.

३) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम क्र.१७६ अन्वये परिपूर्तीचा अहवाल दप्तरी असून तो कोरा आहे. त्या कोऱ्या नमुना १३२ वर नगरपरिषद अभियंता यांनी सही केल्याचे दिसून येते. तसेच नियम १७७ परिपूर्ती प्रमाणपत्रावर सह्या नाहीत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४) प्रमाणक क्र. २२०/ दि. २६/५/१० रु.२,००,०००/- या नमुना २२ वर लेखापाल, अध्यक्ष यांच्या सह्या नाहीत. तसेच मक्तेदारास अदा करावयाच्या धनादेशाचे तपशीला खाली मुख्याधिकारी यांची सही नाही.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.१३,१५,८८३/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. ५३ :- शाहू कला मंदिर येथे कुंपण भिंत, पार्किंग व अनुषंगिक कामे करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.११,००,०००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | सर्व साधारण सभा ठ. क्र. ८०५ दि.१/१२/०९ |
| तांत्रिक मान्यता | : | ३८२ मजीप्रा. बां. वि. सातारा दि. ६/२/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | मे. बालाजी कन्स्ट्रक्शन कंपनी |
| कामाचा आदेश | : | २४९ दि. ९/६/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४९ पान क्र. ३८ ते ३९ |
| लेखाशिर्ष | : | वैशिष्ट्यपूर्ण काम |
| करारपत्र | : | रु.३,०००/- |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.३५६५८ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.२८५२६<br>आयकर रु.७१३२ विमा रु.७१३२ रॉयल्टी रु.१५६४१ |
| झालेला खर्च | : | प्र. क्र. २२९६ दि.१७/३/११ रक्कम रु.७,१३,१६२ |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) कामाचा रीतसर आदेश जा. क्र./सानप/सांबा./२४९ दि. ९/६/१० रोजी सुरू करून करारनामा अटी व शर्ती प्रमाणे व टेंडर स्पेसिफिकेशन प्रमाणे करावयाची दिलेली मुदत ६० दिवसांमध्ये पूर्ण करावयाचे असता काम पूर्ण झालेचे दिसून येत नाही. सदर काम पूर्ण होईपर्यंत रक्कम रुपये ७,१३,१६२/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. ५४ :- राजमाता जिजाऊ उद्यान गोडोली येथे वॉचमन केबीन बांधणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.२,०५,७०६/- |
| वाढीव अंदाजपत्रक | : | रु.३,०८,४१०/- ठराव नं. १९६ दि.२/७/१० |
| प्रशासकीय मान्यता | : | वृक्ष प्राधिकरण समिती ठराव नं. १४० दि. १५/६/०९ |
| तांत्रिक मान्यता | : | जा. क्र./चिशा/तां.मं./३०३३ अ/१० दि.१/९/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. सागर रामदास खताळ |
| कामाचे आदेश | : | जा. क्र/सानप/सां.बा./वृक्ष-१३४ दि.३/२/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम पूर्ण दि.३/२/१० |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४० |
| लेखाशिर्ष | : | बाग सादिल |
| करारपत्र | : | रु.६००/- दि. ३/२/१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.३,११२ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.३,१९४ |
| | | आयकर रु.१,५९७ विमा रु. - रॉयल्टी रु. - |
| झालेला खर्च | : | प्र. क्र. ११५२ दि. १४/१०/१० रु.७९,८४९/- |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर कामास सुरुवातीचे अंदाजपत्रक र. रु.२,०५,७०६/- यांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा यांची तांत्रिक मंजूरी नसताना सदर कामास प्रशासकीय मान्यता व वर्क ऑर्डर देवून काम सुरू कसे काय केले. या नियमबाह्यतेबाबत खुलासा करून रक्कम रुपये २,०५,७०६/- तांत्रिक मान्यता दाखवावी.

२) वृक्ष प्राधिकरण समितीच दिनांक १६/१/२०१० चा दर मंजूर ठराव क्र. १६४ नस्तीसोबत जोडण्यात आला नाही.

३) सदर कामाचे मोजमाप पुस्तक क्र. ४० लेखी मागणी करूनसुद्धा उपलब्ध करून दिले नाही. उपरोक्त कामावर झालेल्या खर्चाची पडताळणी करता आली नाही. तरी मोजमाप पुस्तका अभावी सदरचा खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

**परिच्छेद क्र. ५५ – वॉर्ड क्र. ६ पेठ मल्हार अंतर्गत बोळ व रस्ते याठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.५,००,०००/– |
| प्रशासकीय मान्यता | : | स्थायी समिती ठ. क्र. १३१२ दि. ४/६/१० |
| तांत्रिक मान्यता | : | क्र. २६५९/१० दि. १९/७/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | तुषार बा. पवार |
| कामाचे आदेश | : | क्र. ५५३ दि. १३/९/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम पूर्ण दि. २२/९/१० |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४९ पान क्र. १४ ते १६ |
| लेखाशिर्ष | : | रस्ते |
| करारपत्र | : | दि. ७/९/१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.२५,७६९ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.२०,५४३ आयकर रु.५,१३६ विमा रु.५,१३६ रॉयल्टी रु.१,०७३ |
| झालेला खर्च | : | प्र.क्र.१२५८ दि.२३/१०/१० रु. ५,१३,५७९=०० |

उपरोक्मत प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

निविदा प्रसिद्धी दि. १२/७/१० निविदा उघडणे दि. ९/८/१०

१) महाराष्ट्र न. प. अधिनियम १९६५ कलम ७२ नुसार निविदा नोटीस प्रसिद्ध करण्यापूर्वी त्या कामांस सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मंजूरी घेणे बंधनकारक असताना उपरोक्त कामाकरीता दिनांक १९/७/१० नुसार तांत्रिक मान्यता घेतलेली आहे. परंतु तांत्रिक मान्यता मिळण्यापूर्वीच दि.१२/७/१०

ला निविदा नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सदर नियमबाह्यतेबाबत लेखापरीक्षणांस पूर्तता दर्शवावी.

२)  सदर कामाची मुदत ६० दिवस इतकी असून प्रत्यक्षात काम १३/९/१० ते २२/९/१० या कालावधीत १० दिवसांतच पूर्ण केले आहे. स्थायी निर्देश क्र. १७ मधील मुद्दा क्र. ९ अन्वये योग्य कार्यवाही केली नसल्याने प्रत्यक्षात काम कोणत्या दिनांकास सुरू होते / पूर्ण केले याबाबत लेखापरीक्षणांस पूर्तता दर्शवावी.

तोपर्यंत रक्कम रु.५,१३,५७९=०० लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ५६ :- वॉर्ड क्र. ३० मधील सांस्कृतिक भवनास विद्युतीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| प्रशासकीय ठराव | : ११८८ दि. २५/३/१० | मक्तेदार – श्री. मनोज सुरेश शेंडे |
| अंदाजपत्रकीय रक्कम | : रु.१५,०००/– | |
| जाहिरात | : दै. मुक्तागिरी दि. ९/४/१० | |
| वर्क ऑर्डर | : – | करारपत्र : – |
| प्रमाणक क्र. २२०२/२ | दिनांक ९/३/११ | रक्कम रु.१८,५३४/– |

उपरोक्त कामावर खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

१)  उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु.१५,०००/– खर्च र. रु.१८,५३४/– अंदाजपत्रकापेक्षा र. रु.३,५३४/– जादा खर्च केला आहे.

२)  नस्तीसोबत सदर कामाची वर्क ऑर्डर (कामाचा आदेश) जोडला नाही. त्यामुळे कामाचा आदेश कोणत्या दिनांकास देण्यात आला हे समजू शकले नाही. तसेच करारनामासुध्दा जोडला नाही. कामाचा आदेश व करारनामा शिवाय काम कसे केले याबाबत खुलासा करण्यात यावा.

३)  निविदेचा दर मान्य म्हणून निविदा पान क्र. ४ वर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही.

४)  न. नं. १३३ वर काम पूर्ण झाल्याबाबतच्या प्रमाणपत्रावर मुख्याधिकारी सातारा यांची स्वाक्षरी नाही. तरी स्वाक्षरी घेऊन पूर्तता दाखवावी.

उपरोक्त कामावर केलेला एकूण खर्च र. रु.१८,५३४/– लेखा परीक्षणांत अक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

**परिच्छेद क्र. ५७ :- गोडोली नं. २३, नगरपालिका शाळा येथे ध्वनिक्षेपक बसविणे.**

प्रमाणक क्र. २२०२/४ दिनांक ९/३/११ र. रु.३१,६७५/-

अंदाजपत्रक : रु. २२,०००/-

निविदा प्रसिद्धी : दै. मुक्तागिरी दि. ९/४/१०

करारपत्र : रु.१००/- दि. ३/६/१०

मक्तेदार : श्री. मनोज सुरेश शेंडे

वर्कऑर्डर : क्र. ४८ दिनांक ३/६/१०

उपरोक्त कामावर खालीलप्रमाणे अभिप्राय -

१) सदर कामाचे अंदाजपत्रक रु.२२,००० असून खर्च रक्कम रुपये ३१,६७५/- करण्यात आला आहे. जादा खर्च कशाच्या आधारे करण्यात आला याचा खुलासा करावा व जादा खर्चास मंजूरी घेण्यात यावी.

२) उपरोक्त कामासाठी ३ निविदा (दरपत्रके) मागविण्यात आली होती. र. रु.२७,३०५/- श्री.मनोज सुरेश शेंडे यांची कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली असताना स्थायी समिती ठराव क्र. १२८३ दिनांक ४/५/१० ने र. रु. २७,०००/- खर्चास मंजूरी देण्यात आली आहे. याबाबत खुलासा करावा.

३) करारपत्रावर दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या नाहीत. तरी ती घेण्यात यावी.

४) वर्क ऑर्डर दि.३/६/१० तर कामाची मुदत १५ दिवस असताना काम पूर्ण दि.२/७/१० रोजी झाले. मुदतीपेक्षा काम उशीरा का पूर्ण करण्यात आले याबाबत खुलासा करण्यात यावा व उशीरा कामाबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात आली / नाही याबाबत खुलासा करण्यात यावा.

५) न. नं. १३३ वर काम पूर्ण झाल्याबाबतच्या प्रमाणपत्रावर मुख्याधिकारी म. पा. सातारा यांची स्वाक्षरी नाही. तरी स्वाक्षरी घेऊन पुर्तता दाखवावी.

उपरोक्त खर्च र. रु.३१,६७५/- लेखा परीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ५८ :- शाहू कला मंदिर अंतर्गत सुशोभिकरण करणेबाबत.**

अंदाजपत्रक : रु.१,०३,०८,०४१/- भाग २ रु.४६,२०,१६२/-

प्रशासकीय मान्यता : क्र. १९६ दिनांक १२/९/०७

तांत्रिक मान्यता : जा. क्र. चिशा/७४/०८ दि. १०/१/०८

मक्तेदाराचा नाव : श्री. ए. एन. दुधकिया

कामाचे आदेश : ३०४ दि. २६/६/०८

कामाची मुदत : ६ महिने

मोजमाप पुस्तक : क्र. ३३ पान क्र. १७० ते १७१

लेखाशिर्ष : वैशिष्ट्यपूर्ण काम अनुदान.

करारपत्र : रु.११,२००/-

कपाती : सुरक्षा ठेव रु.२८,८१२ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.२३,०७४

आयकर रु.१२,६९१ विमा – रॉयल्टी रु.४,३२०

झालेला खर्च : प्रमाणक क्र.२९ दि. २०/४/१० र. रु.५,७६,८४१/-

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) देयकाच्या वजावटींमधून १% कामगार उपकर कपात केलेला नाही. ती रक्कम रु.५,७६८/- संबंधीत मक्तेदाराकडून वसुलात आणून शासनाकडे जमा करण्यात यावी.

२) कामाचा रितसर आदेश जा. क्र. ३०४ दि. २६/६/०८ रोजी सुरू करून कामाची दिलेली मुदत ६ महिने मध्ये पूर्ण करावयाचे असता काम पूर्ण झालेचे दिसून येत नाही. सदर काम पूर्ण होईपर्यंत रक्कम रुपये ५,७६,८४१/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. ५९ :- पोवई नाका येथे नवीन ट्राफिक सिग्नल बसविणेसाठी पोल रोवणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.२,७२,८९५/- |
| प्रशासकीय मान्यता | : | १२५२ दि. ४/५/१० व ११४५ दि.२५/३/१० |
| तांत्रिक मान्यता | : | जा. क्र. चिशा/तां.म./४१७०/१०. म. जी. प्रा. सा.बां. वि. दि.४/१०/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | न्युकलाऑनिकस पुणे |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/पापू/आरोग्य/१०९ दि.६/१/११ |
| कामाची मुदत | : | २७ दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. पान क्र. ७९ ते ८३ |
| लेखाशिर्ष | : | पोवई नाका ट्राफिक सिग्नल |
| करारपत्र | : | रु.१,१००/- |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.१३,९९७ व्हॅट रु.५,५८७<br>सरचार्ज रु.५५९ आयकर रु.५,५८७ विमा रु. २,७९४ |
| झालेला खर्च | : | प्रमाणक क्र.२६४६ दि. ३१/३/११ रु.२,५०,८०२ |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) म. शा. उद्योग व उर्जा विभाग शा. नि. २/१/९२ नुसार कोणतीही खरेदी करताना शासनाच्या दर करार असल्यास त्या दर करारानुसार ट्राफिक सिग्नल व्यवस्था खरेदी करणे आवश्यक असताना न. प. साताराने ट्राफिक सिग्न साहित्य खरेदी करताना दर करार आहे किंवा नाही. याबाबत कोणतीही शहानिशा केलेली नाही. यावरून दरकरार असलेबाबत न. प. साताराने खात्री केली नसल्याचे दिसते. तरी याबाबत खुलासा करावा. जर दरकरार असेल व त्याचे दर कमी असल्यास जास्त अदाई वसुल करण्यात यावी.

२) लेखा संहिता नियम १७७ नुसार मुख्याधिकारी यांनी काम पूर्ण झालेची स्वत: पाहणी करून नमुना १३३ स्वाक्षरीत करावयाचा आहे. तथापी सदर नमुना मुख्याधिकारी यांनी स्वाक्षरीत केला नाही. काम पूर्णत्वाचा दाखला दिला नसताना अंतिम बील मक्तेदारास कशाचे आधारे आदा केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तोपर्यंत र. रु. २,५०,८०२/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६० :- पोवई नाका येथे ट्राफिक सिग्नल बसविणेसाठी सुधारीत पद्धतीचे लॅम्प हेडस बसविणे बाबत.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.४,३९,६६५/- |
| प्रशासकीय मान्यता | : | १४७२ दि. ३१/१२/१० |
| तांत्रिक मान्यता | : | जा. क्र. चिशा/तां.म./४१७६/१० दि. ४/१०/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | न्यूकलीऑनिक्स, पुणे |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सा.बां./पा.पु./आरोग्य/विद्युत११० दि. ६/१/११ |
| कामाची मुदत | : | २७ दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. पान क्र. ८४ ते ८६ |
| लेखाशिर्ष | : | पोवई नाका ट्राफीक सिग्नल. |
| करारपत्र | : | रु.१,१००/- |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.२५,४०६ व्हॅट रु.१०,१६३ सरचार्ज रु.१,०१७ आयकर रु.१०,१६३ विमा रु.१,०१७ |
| झालेला खर्च | : | प्रमाणक क्र.२६४६ दि.३१/३/११ रु.४,५६,२९४ |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) म. शा. उद्योग व उर्जा विभाग शा.नि. २/१/९२ नुसार कोणतीही खरेदी करताना शासनाच्या दर करार असल्यास त्या दर करारनुसार लॅम्प हेड्स खरेदी करणे आवश्यक असताना न. पा. साताराने लॅम्प हेडस साहित्य खरेदी करताना दर करारा आहे किंवा नाही याबाबत कोणतीही शहानिशा केलेली नाही. यावरून दर करार असलेबाबत न. प. साताराने खात्री केली नसल्याचे दिसते. तरी याबाबत खुलासा करावा. जर दर करार असेल व त्याचे दर कमी असल्यास जास्त अदाई वसूल करण्यात यावी.

२) लेखासंहिता नियम १७७ नुसार मुख्याधिकारी यांनी काम पूर्ण झालेची स्वत: पाहणी करून नमुना १३३ स्वाक्षरीत करावयाचा आहे. तथापी सदर नमुना मुख्याधिकारी यांनी स्वाक्षरीत केला नाही. काम पुर्णत्वाचा दाखला दिला नसताना अंतिम बील मक्तेदारास कशाचे आधारे अदा केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तोपर्यंत रक्कम रुपये ४,५६,२९४/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६१ :- वॉर्ड क्र. १०, मातंग वस्ती लगत गटर व पाईप लाईन करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१,३७,१००/- |
| प्रशासकीय मान्यता | : | जि. अ. प. क्र. २८५३ दि. १५/१०/१० |
| तांत्रिक मान्यता | : | म. जी. प्रा. बांधकाम विभाग प. क्र. २४२३ दि.११/६/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. विनायक साहेबराव साळुंखे |
| कामाचे आदेश | : | प. क्र. ११७६ दि. २१/३/११ |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम सुरु २१/३/११ काम पूर्ण २९/३/११ |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५० पान क्र. ८ व २ ते ८४ |
| लेखाशिर्ष | : | दलित वस्ती सुधारणा |
| करारपत्र | : | दिनांक नमूद नाही |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.७,०१८ व्हॅट २% रु.२,८०७<br>आयकर रु.१४०४ विमा रु.१४०४ रॉयल्टी रु.२,३४३ |

झालेला खर्च :

प्र.क्र.२७२१ दि.३१/३२११ रु.१,४०,३६७/- शेरा (एन.पी.१,२५,३५१)

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) काम पूर्ण करण्याकरीता मुदत ६० दिवसांची असून सदरहू काम दि.२१/३/११ ते २९/३/११ या कालावधीत ८ दिवसांतच पुर्ण झाल्याने, कार्यादेश, करारनामा, काम पुर्णत्वाचा दाखला यामध्ये विसंगती दिसून येते.

२) स्थायी निर्देश क्र. ३७ मधील परिच्छेद १६ ते २० मध्ये नमूद केल्याप्रमाणे कामाची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी कामामध्ये वापरण्यांत येणाऱ्या घटक साहित्याच्या व त्याद्वारे निर्मित कामाच्या गुणनियंत्रण चाचण्या घेणे आवश्यक असताना याबाबत प्रमाणपत्रे / कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

३) काम पुर्णत्व दाखल्यावर सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी नसताना देयक अदा केले आहे.

उपरोक्त अनियमितता / त्रुटींबाबत लेखापरीक्षणांस पुर्तता दर्शवावी.

**परिच्छेद क्र. ६२ :- वॉर्ड क्र. ८, ४४० सदरबझार म्हाडा कॉलनी ते सैनिक स्कुल ते डी.एस.पी. बंगला अखेर रस्ता डांबरीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.३,१८,६२०/- |
| प्रशासकीय मान्यता | : | जि. अ. प. क्र. २८५३ दि. १५/१०/१० |
| तांत्रिक मान्यता | : | प. क्र. २४२३ दि. ११/६/१० |
| मक्तेदाराचे नांव | : | श्री. विनायक साहेबराव साळुंखे १३.१०% जास्त दराने. |
| कामाचा आदेश | : | प. क्र. १०१३ दि. १/२/११ |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम सुरू १/९/११ काम पूर्ण २५/३/११ |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५५ पान क्र. १४ ते १५. |
| लेखाशिर्ष | : | दलित वस्ती सुधारणा |
| करारपत्र | : | दिनांक नमूद नाही (स्टॅम्प खरेदी दि.१४/१/११) |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.१७,९६८ २% व्हॅट रु.७,१८८ |
| | | आयकर रु.३,५९४ विमा रु.३,५९४ रॉयल्टी रु.६,७८३ |
| झालेला खर्च | : | |

प्र. क्र. २७२२ दि.३१/३/११ र. रु.३,५९,५३५/- शेरा (नेट पे. ३,२०,४०९/-)

उपरोक्त प्रमाणकाचे लेखा परीक्षण करून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर काम दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत असून मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचे प्रशासकीय मंजूरी आदेश दि. १५/१०/१० व सहा. संचालक, नगर रचना यांचे नकाशा मंजूरी आदेश२०/३/१०

मध्ये नमूद अटीप्रमाणे प्रस्तावित कामाचे ठिकाणी ५०% टक्के पेक्षा जास्त दलितांची संख्या असल्याबाबत खात्री करावयाची आहे.

याबाबत न. प. कडून सक्षम प्राधिकारी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करून पुर्तता करावी.

२) सदर कामाकरीत दै ऐक्य वृत्तपत्रात दि. २२/१०/१० रोजी निविदा प्रसिद्ध केली असून अंतिम मुदत दि. ३/११/१० दिली.

शासन निर्णय २/१/९१ – दि. ४/२/२००३ तसेच स्थायी आदेश क्र. ३६ मध्ये नमूद केल्यानुसार निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत कमी तीन आठवड्यांचा कालावधी देणे बंधनकारक असताना न. प. ने कमी मुदतीची निविदा मागविली आहे.

याबाबत लेखापरीक्षणास सविस्तर पुर्तता करावी.

**परिच्छेद क्र. ६३ :- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी) यासाठी सर्व्हेक्षण, प्रकल्प अहवाल इ. साठी सल्लागार नेमणूक करणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रशासकीय मान्यता | : | ठराव क्र. २४५ दि. १२/१२/०७ | |
| तांत्रिक मान्यता | : | कार्य. अभि. पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. १४३४ दि. १७/९/११ | |
| सल्लागाराचे नाव | : | श्री. जयंत विनायकराव किकले, बारामती ४.९९% अधिक्य | |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/१२३५/ दि. २३/१२/०८ | |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४७ | पान क्र. १६९ |
| करारपत्र | : | रु.१०० | दिनांक २३/१२/०८ |
| वजाती | : | आयकर रु.६०,२६२ | |
| झालेला खर्च | : | | |

प्र. क्र. – दि. २५/३/११ र. रु.१०,९५,६७३/- शेरा – प्रथम देयक पैकी पार्ट पेमेंट ३,००,०००

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (आयएचएसडीपी) अंतर्गत सातारा शहरातील घोषित झोपडपट्टी धारकांचे सर्व्हेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास विविध खात्याच्या

मंजूऱ्या घेणे यासाठी सल्लागार नेमणूक करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांमधील श्री. किकले यांची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) करार पत्रातील अट क्र. ६ नुसार ४५ दिवसात सर्व्हेक्षण करणे व अट क्र. ७ अन्वये तद्नंतर १५ दिवसात प्रकल्प अहवाल नगरपालिकेला सादर करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही दिसून येत नाही. दप्तरी उपलब्ध श्री. किकले यांचे पत्र क्र. ६४ / दि.४/११/०९ अन्वये प्रकल्प अहवाल न.पा.स उशीरा सादर करण्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२) मोजमाप पुस्तकावर रेकार्ड एंट्रीच्या तारखा नाहीत.

३) निविदेतील अटींप्रमाणे सर्व्हीस टॅक्स सल्लागाराला आदा केली आहे. मात्र सदरची रक्कम सल्लागाराने शासनास भरणा केल्याबाबत त्यांची कागदपत्रे दप्तरी नाहीत.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.१०,९५,६७३/– लेखा परीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६४ :- शाहू स्टेडियम कॉर्नर ते जुना आर.टी.ओ. चौकअखेर रस्त्याच्या कडेला फूटपाथ बांधणेबाबत.**

नवि–६ अनुदान रु.७.०० लक्ष कर्ज रु.४.०० लक्ष एकूण ११.०० लक्ष.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.२२,१६,७१०/– |
| प्रशासकिय मान्यता | : | ठराव क्र. ७४६ / दि. ७/८/०९ |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र./चिशा/तांम/ ५०६/ दि.२२/२/१० |
| मक्तेदाराचे नांव | : | श्री. अनिल गणपत शिंदे ४.९९% अधिक्य |
| कामाचा आदेश | : | जा. क्र. सानप/साबां/१७७ दि. १८/५/१० |
| कामाची मुदत | : | १८० दिवस मुदत वाढ ३१/५/११<br>दुसरी मुदत वाढ ३१/१२/११ |

मोजमाप पुस्तक : क्र. ४५ पान क्र. ८३ ते ८६

करारपत्र : रु.५,४०० दिनांक ४/५/२०१०

वजाती : सुरक्षा ठेव ४९०२८ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) ३९२२३

आयकर ९८०६ रॉयल्टी ५४५२ विमा –

झालेला खर्च :

| प्र.क्र. व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| १३८४/ ३/११/१० | ५,३२,८०० | प्रथम चालू देयक |
| १७६६/ ६/१/११ | ४,४६,७६८ | दुसरे चालू देयक |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर कामाची निविदा सूचना क्र. १०७० दि. २३/३/१० मधील अटीप्रमाणे २% सुरक्षा अनामत रोख भरावयाची आहे व उर्वरीत बिलातून कपात करावयाची आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणी सर्वसाधारण पावती क्र. १२२३४ दि.११/५/१० अन्वये सुरक्षा अनामत रु.२०,७००/– रोख भरणा केली आहे. मात्र सदरच्या अटी प्रमाणे रु.४४,३३०/– भरणा करणे आवश्यक असता कमी सुरक्षा अनामत रु.२३,६३०/– भरणा केली आहे.

२) सदर कामाचे अंदाजपत्रकावर नगर अभियंता / मुख्याधिकारी न. पा. सातारा यांची सही नाही. तसेच कामाचे नांव नमूद नाही.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जीआर–३४/सा.४/५९९० दिनांक ८/१/२००७ नुसार बांधकामाचे गुणनियंत्रण योग्य प्रकारे होण्यासाठी वापरावयाचे खडी, कॉंक्रीट यांची शासकिय प्रयोग तंत्रशाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणी गुणनियंत्रण अहवाल दप्तरी नाही.

४) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७४(३) अन्वये देयकाच्या मागील बाजूवर कंत्राटदाराची पोच घेण्यात यावी. मात्र प्रस्तुत प्रकरणी प्रथम चालू देयकाच्या मागे कंत्राटदाराची पोच घेण्यात आली नाही.

५) मक्तेदार श्री. शिंदे यांचा मुदतवाढीबाबत अर्ज दप्तरी असून त्यावर तारीख नाही. मात्र त्यावरील आवक क्र. ७५८२ दि. १५/११/१० असा नमूद आहे. नियमाप्रमाणे मुदत संपण्याच्या १५ दिवस अगोदर मक्तेदाराने मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत खर्च रक्कम रु.९,८०,५६८/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.६५ : करंजे पार ते भैरवनाथ मंदिर ते सतीआई मंदिर अखेर रस्ता डांबरीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.४,९४,५१७/- |
| प्रशासकिय मान्यता | : | ठराव क्र. ६५४/ दि. २२/१०/०८ |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. कजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र. चिशा/तांम/२०७७<br>दि. ७/५/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | महेंद्र कन्स्ट्रक्शन |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/१५३ दि. ११/५/१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस काम सुरु १३/५/१० काम पूर्ण १२/७/१० |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४९ पान क्र. १९ ते २०. |
| करारपत्र | : | रु.६०० दि. २३/९/२०१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव १७,३८८ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) ६९५५<br>आयकर ७६५१ विमा १७२६ |
| झालेला खर्च | : | प्र. क्र. १२५६ दि.२२/१०/१०<br>रक्कम रु.३,४७,७६० शेरा - प्रथम व अंतिम देयक |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर कामाचे अंदाजपत्रक बीबीएम, कारपेट, सिलकोट २०९० स्क्वे. मी. यांचे मात्र प्रत्यक्षात मोजमाप पुस्तकातील रेकॉर्ड एंट्री प्रमाणे फक्त कारपेटचे २३१३.३९ स्क्वे. मी. काम करण्यात आले आहे. तरी मनपा लेखा संहिता १९७१ नियम १६७(१)(२) अन्वये प्रथम मान्यता देणाऱ्या प्राधिकाऱ्यांच्या

मंजूरी विना मूळ अंदाजात काहीही बदल करता येणार नाही. तसेच अशा फेरबदलास मंजूरी देण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने फेरबदल अंदाजपत्रकामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. तसेच अंदाजपत्रकापेक्षा १०% पेक्षा जादा खर्च होत असल्यास सुधारीत अंदाजपत्रक करून त्यास फेर प्रशासकिय / तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असता त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

२) निविदा नोटीस दप्तरी नाही. त्यामुळे विहीत वेळेत निविदा प्राप्त झाल्या किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

३) प्रशासकिय मंजूरी नंतर जवळ जवळ पावणे दोन वर्षानंतर तांत्रिक मंजूरी व वर्क ऑर्डर देणेत आली आहे. या विलंबा बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे स्थायी निर्देश क्र. ३७ दि. ३/१/२००९ व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जीआर-३४/सा.४/५९९० दिनांक ८/१/२००७ नुसार विकास कामाचे गुणनियंत्रण योग्य प्रकारे होण्यासाठी वापरावयाचे खडी, डांबर यांची शासकिय प्रयोग तंत्र शाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे गुणनियंत्रण अहवाल दप्तरी नाहीत.

उपरोक्त आक्षेपाच्या पूर्तते अभावी खर्च रु.३,४७,७६०/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६६ :- पेठ सदरबझार वॉर्ड क्र. ८ सिम्बॉयसिस हॉस्पिटल जवळील रामा नजीकच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१,००,०००/- व सुधारीत रु.२,४२,३००/- |
| प्रशासकिय मान्यता | : | स्थायी समिती ठराव क्र. १६९३ दिनांक १८/७/०९ व क्र. ११८२ दिनांक २५/३/१० |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. मजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र. चिशा/तांम/२२१२ दि. २१/५/१० |
| मक्तेदाराचे नांव | : | मे. रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा ४.९९% अधिक्य |

कामाचे आदेश : जा. क्र. सानप/सांबा/७०५/ दि.१०/१२/०९

कामाची मुदत : ३० दिवस

मोजमाप पुस्तक : क्र. ४०, ४५ पान क्र. १२७ व ७९ ते ८२

करारपत्र : रु. ३५०, दिनांक १०/१२/०९

वजाती : सुरक्षा ठेव रु.७०८० सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.५६४८

आयकर रु.३१०६ रॉयल्टी रु.२२२५ विमा –

झालेला खर्च :

| प्र.क्र. व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| – | ९०,७१५ | प्रथम चालू देयक |
| १५२३ ९/१२/१० | १,४१,२२० | दुसरे व अंतिम देयक |
| एकूण | २,३१,९३५ | |

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर कामाचे रेकॉर्ड एंट्रीची मापे मोजमाप पुस्तक क्र. ४० मध्ये घेण्यात आली आहेत. मात्र वारंवार तोंडी मागणी करून देखील मोजमाप पुस्तक क्र. ४० व प्रथम चालू देयक लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे मोजमाप पुस्तक क्र. ४५ मध्ये घेण्यात आलेल्या मापाची तपासणी करता आली नाही. तरी यामध्ये काही आर्थिक अनियमितता आढळून आल्यास त्यांची जबाबदारी संबंधीतावर निश्चित करण्यात यावी.

२) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे स्थायी निर्देश क्रं. ३७ दि. ३/१/२००९ व सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जीआर–३४/सा.४/५९९० दिनांक ८/१२/२००७ नुसार विकास कामाचे गुणनियंत्रण योग्य प्रकारे होण्यासाठी वापरावयाचे खडी, डांबर याची शासकिय प्रयोग तंत्र शाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे गुणनियंत्रण अहवाल दप्तरी नाहीत.

उपरोक्त आक्षेपाच्या पुर्तते अभावी खर्च रु.२,३१,९३५/– लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.६७ :- वॉर्ड क्र.९ - ७५ पेठ कामाठीपुरा ते सरकारी नळ अखेर रस्ता डांबरीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.१,००,०००/- |
| प्रशासकिय मान्यता | : | स्थायी समिती ठराव क्र. ११९७ दि. २५/३/१० |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ., मजिप्रा. सातारा यांचे पत्र क्र. चिशा/तां.म./२२१२ दि. २१/५/१० |
| मक्तेदाराचे नाव | : | मे. रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा ४.९९% अधिक्य |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/साबां/१६५/ दि. १४/५/२०१० |
| कामाची मुदत | : | ६० दिवस |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ४५ पान क्र. ९१ ते ९२ |
| करारपत्र | : | रु.४०० दिनांक १४/५/१० |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.५४९६ सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.४३९७ आयकर रु.२१९९ रॉयल्टी रु.३१४८ |
| झालेला खर्च | : | |

प्र.क्र. ११५५ दि. १४/१०/१० रु.१,०९,९२७/- प्रथम व अंतिम देयक

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर काम मंजूरीच्या टिप्पणीमध्ये सदर रस्त्यास मोठ मोठे खड्डे पडले आहेत ते बुजवणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. मात्र प्रत्यक्षात कामाचे अंदाजपत्रक कारपेट व सिलकोट ५१८.९० स्क्वे.मी. केले आहे. तरी रस्त्यास पडलेले खड्डे बुजविण्यासाठी बीबीएम ची तरतूद करून त्याप्रमाणे काम करणे आवश्यक असता खड्डे पडलेल्या ठिकाणी बीबीएम न करता कारपेट व सिलकोट कसे काय केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे स्थायी निर्देश क्र. ३७ दि. ३/१/२००९ व सार्वजनिवक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जीआर-३४/सा.४/५९९० दिनांक ८/१/२००७ नुसार विकास कामाचे गुणनियंत्रण योग्य प्रकारे होण्यासाठी वापरावयाचे खडी, डांबर याची शासकिय प्रयोग तंत्र

शाळेकडून तपासणी करून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे गुणनियंत्रण अहवाल दप्तरी नाहीत. उपरोक्त आक्षेपाच्या पूर्तते अभावी खर्च रु.१,०९,९२७/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६८ :- वॉर्ड क्र. २२ पेठ यादोगोपाळ सि.स. नं. २०६ नरगुंदे घर ते सि.स.नं. २१६ कोकणे घर अखेर साईडपट्टी कॉंक्रीट करणे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अंदाजपत्रक | : | रु.९६,७००/- | | |
| प्रशासकिय मान्यता | : | बांधकाम समिती ठराव क्र. १९६९ दि. २१/४/१० | | |
| तांत्रिक मान्यता | : | का. अ. म. जि. प्रा. सातारा यांचे पत्र क्र.चिशा/तां.म./२२१३/ दि. २१/५/१० | | |
| मक्तेदाराचे नाव | : | श्री. तुषार बाळासाहेब पवार | ४.९९% अधिक्य | |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/सांबा/७११/ दि. १३/१०/१० | | |
| कामाची मुदत | : | ६० दिवस | | |
| मोजमाप पुस्तक | : | क्र. ५३ | पान क्र. ९ ते १० | |
| करारपत्र | : | रु.३५० | दिनांक १३/९/९० | |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.४९६५ | सेल टॅक्स (कार्यकंत्राट कर) रु.३९७२ | |
| | | आयकर रु.९९३ | रॉयल्टी रु.२१८८ | विमा रु.९९३ |

झालेला खर्च :

प्र. क्र. १६०० दि.१६/१२/१० रु.९९,३०० प्रथम व अंतिम देयक

उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण करून खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१) सदर काम मंजूरीच्या दिनांक ४/३/१० च्या टिप्पणीमध्ये नमूद केले आहे कि सदर रस्त्याच्या ठिकाणी नगरपालिकेने पाईप ड्रेन केलेले असून त्यावर कॉंक्रीट केल्याने रस्त्याची रुंदी वाढणार असल्याने कॉंक्रीट करण्यास मंजूरी मागितली आहे. व त्याप्रमाणे पाईप ड्रेन वर कॉंक्रीट करण्यास मंजूरी दिली आहे. मात्र प्रत्यक्षात सदर कामाचे अंदाजपत्रक भाग १ - पाईप ड्रेन करण्याचे रु.३४,१८०/- व भाग २ -

कॉंक्रीटीकरण याप्रमाणे करण्यात आले आहे. तसेच मोजमाप पुस्तक पान क्र. ५३, पान क्र. ९ बाब क्र. १, २, ३, ४, ५, ६ अन्वये पाईप ड्रेनची मापे नमूद करून मक्तेदारास रक्कम अदा केली आहे.

तरी नस्तीमधील टिप्पणी अन्वये पाईप ड्रेनचे काम झाले असताना पुन्हा त्याचे अंदाजपत्रक तयार करून मक्तेदारास रक्कम कशी काय आदा केली. तसेच प्रशासकिय मान्यता पाईप ड्रेन वर कॉंक्रीटी करण्याची असताना विना मंजूरी पाईप ड्रेन केलेली व मक्तेदारास अदा केलेली खर्च रु.३४,१८०/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. उपरोक्त आक्षेपाच्या पूर्तते अभावी खर्च रु.९९,३००/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६९ :- बांधकामाच्या कागदपत्राबाबत.**

लेखा परीक्षण कालावधीत सातारा नगरपरिषदेतील बांधकाम विभागातील विकास कामाची प्रमाणके, मोजमाप पुस्तके इत्यादींची तपासणी केली असता त्यामध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे उणिवा आढळून आल्या.

१) नगरपरिषद, अंतर्गत बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग अंतर्गत मक्त्याने विकास कामे करण्यात आली आहेत. मात्र त्यातील बहुतांश कामाचा कामगार बिम्याची रक्कम कपात करून विमा संचालनालय, मुंबई येथे भरणा करण्यात आलेल्या नाहीत.

तरी शा. नि. वित्त विभाग क्र। विकास-१०९८/प्र. क्र.२८८९/शासन हमी दिनांक १९/८/९८ विमा संचालक म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. प्राविनि/२३०० सहविमा/सा.बा.वि./संकिर्ण/फ/ दि.२०/४/०१ व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दि. ८ मे. २००२ अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये का कार्यवाही करण्यात आली नाही.

२) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-२००९/ प्र.क्र. १०८/कामगार-७अ/मंत्रालय, मुंबई दिनांक १७/६/२०१० व दि.३/७/२०१० व त्यातील दि.१७ जून २०१० च्या शासन आदेशामधील मुद्दा क्र. ५ व ६ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर या खाती १% उपकराची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे तसेच त्याच आदेशातील परिशिष्ट-१ मधील मुद्दा क्र.४ नुसार कपात केलेल्या उपकराच्या रक्कमेचा धनाकर्ष महाराष्ट्र राज्य इमारत व इतर

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे चलनाद्वारे जमा करणे बाबत निर्देशित केलेला आहे. मात्र या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

३) मेजरमेंटवर रेकॉर्ड एंट्रीच्या ठिकाणी तारखा नमूद केलेल्या नाहीत. त्यामुळे सदरचे काम कधी सुरू व पूर्ण झाले याबाबतची खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही. त्याचप्रमाणे वेळेत काम झाले नसल्यास दंड आकारणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली दिसून येत नाही याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४) मेजरमेंट वरील मापे मान्य म्हणून मक्तेदाराची सही घेण्यात आली नाही. तसेच रक्कम अदा केल्यानंतर मेजरमेंटवर कर्ण रेषा मारणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

५) बिल संमत करण्यात आले त्याचा प्रमाणक क्रमांक मोजमाप पुस्तकाच्या गोषवाऱ्याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. मात्र याबाबीकडे पुर्णता दुर्लक्ष झाले आहे.

६) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७१ नगरपरिषद अभियंता अथवा मुख्याधिकारी यांनी तपासणी केलेले बांधकामाचे निरीक्षण अहवाल दप्तरी नाही.

७) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७६ अन्वये नमुना १३२ कामाच्या परिपूर्तीचा अहवाल प्रत्येक विकास कामाच्या नस्तीस असून त्यावर नगर अभियंता यांची सही आहे. मात्र सदर नमुन्यातील कॉलम मधील माहिती भरण्यात आलेली नाही. तो कोरा असताना त्यामध्ये माहिती न भरता नगर अभियंता यांनी सही कशी काय केली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

८) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७२ अन्वये नमुना नं. १३३ कामाचे परिपूर्ती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विकास कामाच्या नस्तीस नमुना क्र. १३३ जोडण्यात आले आहेत. मात्र त्यावर मुख्याधिकारी, न. पा. सातारा यांची सही नाही. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाबी बाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. ७० :- जावक बारनिशी बाबत.**

न. पा. सातारा कडील जावक बारनिशी सन १०-११ करीता तपासणी असता महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ मधील नियम १४३ नुसार -

१) तिकिटांची खरेदी व त्याचा वापर यांचा हिशेब नमुना क्र. ११३ प्रमाणे ठेवला पाहिजे. प्रत्येक आठवड्याच्या शेवटी हाती शिल्लक राहिलेल्या प्रत्येक किंमतीच्या तिकिटांचा तपशिल 'अभिप्राय' स्तंभात दर्शविला पाहिजे.

२) हाती शिल्लक उरलेली तिकिटे, प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातून एकदा पडताळून पाहिली पाहिजे व त्यांनी स्वाक्षरीनिशी अशा पडताळणीची नोंद पुस्तकात केली पाहिजे. असे असताना उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही का केली नाही.उपरोक्त नियमानुसार कारवाई करून पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ७१ :- ग्रंथालय, वाचनालय विभागाबाबत.**

लेखा परीक्षण कालावधीत सन २०१०-२०११ ची जमा खर्च खतावणी तपासली असता सदर कालावधीत विभागाकडून कोणत्याही जमा खर्चाची नोंद नाही.

भांडार विभागाकडील साठा नोंदवही तपासली असता वाचनालयासाठी ६९५ पुस्तके सन २००७-०८ मध्ये खरेदी केलेली आहेत. मात्र न. पा. ने वाचनालयासाठी सभासद नोंदवून डिपॉझीट, वर्गणी जमा करून न. पा. चे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न केलेला नाही.

न. पा. कडून किती ग्रंथालये, वाचनालये आहेत त्यामधील पुस्तके, मासिके आदी बाबतची माहिती, अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध नाही.

त्यामुळे ग्रंथालय, वाचनालय बाबतचा न. पा. चा मूळ आदेश साध्य होत नाही. उपरोक्त नमूद केले प्रमाणे कार्यवाही करून न. पा. चे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करून केलेल्या कार्यवाहीची पुर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ७२ :- वृत्तपत्र बीलाबाबत.**

प्रमाणक क्र. २४७७(१) दि. ३१/३/११ रक्कम रु.११,२५४/-

उपरोक्त प्रमाणकान्वये मा. अध्यक्ष कक्षास जून २००९ ते डिसेंबर २०१० अखेर पुरविलेल्या वृत्तपत्राचे देयक अदा केले आहे. सदर देयक दिन, उत्सव, सण, सत्कार या लेखाशिर्षां अंतर्गत पारित केले असून वृत्तपत्र देयक सदर लेखा शिर्षां अंतर्गत कोणत्या तरतुदीन्वये पारीत केले याबाबत लेखापरीक्षणांस पुर्तता दाखवावी.

तोपर्यंत सदरचा खर्च रु.११,२५४=०० आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे. तसेच वृत्तपत्रांबाबत नोंदवह्या लेखापरीक्षणांस सादर करून पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७३ :- इतर इमारती विभागामध्ये भाडेनिश्चित करणेबाबत व न. प. शिक्षण मंडळाकडील थकबाकीबाबत.**

न. प. मालकीच्या इतर इमारतींमध्ये अनेक इमारती न. प. शिक्षण मंडळाकडे भाड्याने आहेत. सदर इमारती कोणत्या भाडे निश्चित आदेशान्वये भाड्याने दिलेल्या आहेत. याबाबतचे अभिलेखे न. प. कडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे भाडे निश्चितीबाबत खात्री करता आली नाही.

तसेच न. प. शिक्षण मंडळाकडे सन १०-११ अखेर एकूण ७५,६०,८३०/- इतकी थकबाकी आहे. सदरहू थकबाकी वसुलीबाबत न. प. व शिक्षण मंडळ यांचेकडून योग्य तो पाठपुरावा करून लेखापरीक्षणांस पुर्तता करावी.

**परिच्छेद क्र. ७४ :- न. प. मालकीच्या शॉपिंग सेंटरमधील रिकाम्या गाळ्यांबाबत.**

सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब नुसार न. प. कडे सन १०-११ अखेर खालीलप्रमाणे गाळे रिकामे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सदरबझार शॉपिंग सेंटर | - | ५ गाळे |
| २. | श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले व्यापारी संकुल | - | १७ गाळे |
| ३. | श्री. छ. अभयसिंहराजे व्यापारी संकुल भवानी पेठ ३५ अ, ब, क | - | १५ गावे |
| ४. | पेठ सदाशिव मच्छी मार्केट | - | २ गावे |
| | | एकूण | ३९ गाळे |

सदरहू एकूण ३९ गाळे रिकामे असल्याने न. प. चे आर्थिक नुकसान होत आहे. रिकामे गाळे भाड्याने देण्याबाबत, फेरनिविदा / योग्य ती कार्यवाही करून न. प. नुकसान टाळण्याकरीता उपाययोजना केल्याबाबत लेखापरीक्षणांस पुर्तता दाखवावी. परि. क्र. ५

**परिच्छेद क्र. ७५ :- वृक्ष संरक्षण व संवर्धन प्राधिकरण निधी वृक्ष गणना न केलेबाबत.**

सातारा नगरपालिका सन २०१०-११ अखेर वृक्ष गणना करणेत आलेली नाही. याबाबत पुढील अभिप्रायांच पुर्तता दाखवावी.

१) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे वृक्ष ७ प्रकरण चारप्रमाणे वृक्ष गणना करणे आवश्यक असताना मागील १० वर्षात वृक्ष गणना करणेत आलेली नाही. वृक्ष गणना करणेसाठी वृक्ष प्राधिकरण ठराव क्र. ३८ दि. ११/१०/०७ अन्वये केवळ ठराव करून कार्यवाहीन करणेबाबत खुलासा करावा.

२) विहीत नमुन्यात नोंदवही अद्यायावत ठेवून खाजगी, सार्वजनिक उद्याने व बगीचा तसेच रस्त्यालगतची झाडे याबाबत स्थिती दर्शवावी.

३) संतुलित/असंतुलित, कुजलेले, सुस्थितीतील व आयुष्यमान संपलेले इ. बाबी वृक्ष गणनेत नमूद करून पुर्तता दाखवावी.

४) शोभेची झाडे, फळझाडे, जंगली वृक्ष इ. प्रकारची वृक्ष गणना करून तपशील नोंदवावा.

सबब वृक्ष गणनेची कार्यवाही करून नोंदवही अद्ययावत ठेवावी.

**परिच्छेद क्र. ७६ :- दुरध्वनी नोंदवह्या लेखा परीक्षणास उपलब्ध न झालेबाबत.**

लेखा परीक्षण कालावधी सन २०१०-२०११ मध्ये नगरपरिषदेकडे एकूण १६ दूरध्वनी कार्यान्वित होते. मात्र सदर दूरध्वनींची दूरध्वनी नोंदवही वारंवार मागणी करूनही तसेच खाली नमूद केलेप्रमाणे अर्ध समास पत्रान्वये मागणी करूनही सदर दूरध्वनींच्या नोंदवह्या लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

| अर्धसमास पत्र क्रमांक | दिनांक |
|---|---|
| ३ | २/३/१२ |
| ५ | १२/३/१२ |
| १५ | २१/३/१२ |
| १६ | २२/३/१२ |

सन २०१०-११ मध्ये दूरध्वनी बिलावर रक्कम रु.३,३१,२०२/- खर्च झाला आहे. दूरध्वनी नोंदवह्या उपलब्ध न झाल्याने खाजगी कॉल वरील खर्चाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

दूरध्वनी बिलासाठी सन २०१०-११ मध्ये रक्कम रु.३,००,०००/- तरतूद करण्यात आली होती व वार्षिक खर्च रु.३,३१,२०२/- म्हणजेच बजेट बाह्य खर्च रु.३१,२०२/- झाला आहे. म.शा.वि विभागाकडील निर्णय क्र. बीपीटी १०००प्र. क्र.५६ / २००० वित्तिय सुधारणा १०/०९/०१ अन्वये दूरध्वनी खर्चात काटकसर करण्याच्या दृष्टीने केलेल्या सुचनांचे पालन केले बाबत लेखा परीक्षणाची खात्री पटवावी.

**परिच्छेद क्र.७७ :- वृक्ष विभागाकडील झाडे विक्री नोंदवही लेखापरीक्षणास सादर न केल्याबाबत.**

सन २०१०-११ मधील झाडे विक्री जमा नोंदवही लेखा परीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे झाडे विक्रीपासून मिळालेले उत्पन्न यांची नोंदवही व त्या संबंधित जमा पावत्या अभावी खात्री करता आली नाही. नोंदवही लेखा परीक्षणास का सादर केली नाही याबाबत खुलासा करून त्यामध्ये काही गैरमेळ झाला नसल्याबाबत अंतर्गत लेखा परीक्षकाने तसे प्रमाणित करून पुर्तत अहवाल लेखा परीक्षणास सादर करावा.

**परिच्छेद क्र. ७८ :- बांधकामांचे पुस्तकाबाबत.**

अ) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम १८२ नुसार किरकोळ बांधकामाखेरीज इतर सर्व बांधकामांना हिशेब नमुना १३९ प्रमाणे ठेवणे आवश्यक आहेत. तसेच अंदाजात दाखविलेल्या वेगवेगळ्या शीर्षाप्रमाणे त्याचे सुयोग्य वर्गीकरण करून खर्चाची तपशीलवार नोंदणी केली पाहिजे. असे असताना महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम १८१ नियम १८२ नुसार नगरपरिषदेने कोणत्याही बांधकामांचे विहित नमुन्यातील पुस्तक ठेवलेले नाही. सदर अनियमिततेबाबत लेखापरीक्षणांस पुर्तता दर्शवावी.

ब) हत्यारे, सयंत्रे पुस्तकाबाबत – महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम १८४ अन्वये नमुना क्रमांक १४१ प्रमाणे नगर परिषदेने हत्यारे व सयंत्रे यांचे पुस्तक ठेवणे बंधनकारक आहे. याबाबत लेखासंहितेमध्ये सुचित केल्यानुसार

१. सयंत्र आणि यंत्रसामग्री २. उपकरणे ३. हत्यारे व किरकोळ वस्तू

असे तीन भाग करून नोंदवही / पुस्तक चालू कालावधीपर्यंत परिपूर्ण ठेवणे बंधनकारक आहे.

परंतु न. प. ने कोणतीही नोंदवही/पुस्तक ठेवले नसल्याने न. प. कडे असलेल्या हत्यारे /सयंत्रे याबाबत लेखापरीक्षणांस तपासणी करता आली नाही. सदर अनियमिततेबाबत पुर्तता दर्शवावी.

**परिच्छेद क्र. ७९ :- नळ कनेक्शन अनामत नोंदवही बाबत.**

पाणी पुरवठा विभागाने वर्ष २०१०–११ मध्ये नळ कनेक्शन नोंदवही ठेवलेली आहे. या नोंदवहीतील नोंदीप्रमाणे२०१०–११ वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण ३२१ नळ कनेक्शन्स दिल्याचे दिसून येते. त्यापोटी अनामत रक्कम रुपये १,६०,५००/– जमा झाले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

१) लगतचे वर्ष २००९–१० अखेरपर्यंत प्रतिवर्षी किती नळ कनेक्शन्स दिली, तसेच किती बंद केली याचा गोषवारा काढलेला नाही. त्यास्तव न. पा. कडे एकूण किती नळ कनेक्शन्स आहेत, याची माहिती उपलब्ध झाली नाही.

२) सदरची खाजगी नळ जोडणीची नोंद न. पा. लेखासंहिता १९७१ नियम ९९ अन्वये नमुना ६२/ अ–ब प्रमाणे ठेवण्याची आहे. तशी नोंदवही ठेवलेली नाही.

३) सातारा शहरात होणारा पाणीपुरवठा हा मापकाप्रमाणे केला जातो किंवा कसे याची माहिती उपलब्ध झाली नाही. नियम क्र. ८९ प्रमाणे नमुना ६३ मध्ये पाणमापक नोंदवही ठेवण्याची आहे, तशी नोंदवही ठेवलेली नाही.

४) नळ कनेक्शन डिपॉझिट कामी जमा झालेली रक्कम वर्षनिहाय गोषवारा न काढल्याने समजुन येत नाही. तथापी वर्ष २०१०–११ मध्ये डिपॉझिट सदरी जमा झालेली रक्कम रुपये १,६०,५००/– गुंतवणूक केल्याचे दिसून येत नाही.

५) पाणी शुद्धीकरणाकामी उपयोगत आणली जाणारी रायनांची खर्च नोंदवही ठेवलेली नाही. त्यास्तव रसायनांचा दैनंदिन वापर किती प्रमाणात होतो याची माहिती मिळाली नाही.

नगरपरिषदेने प्रत्यक्ष कराचे नोंदवहीत मागणी, वसुली नोंदवहीप्रमाणे करणेत आली किंवा कसे याबाबत आक्षेप अहवालात नमूद केलेले आहेत.

नगरपरिषदेस मिळालेल्या अनुदानाचा वापर अहवालातील आक्षेपास अधिन राहून त्याच कारणासाठी करण्यात आला आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे नियम १०(१) अनुसार हा लेखापरिक्षण अहवाला मिळाल्यापासून चार महिन्याच्या आत त्याचे अनुपालन वृत्त दोन प्रतीत नगरपरिषदेच्या ठरावासह मा. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे यांना सादर करावे.

लेखापरिक्षण अहवाल मिळाल्याची पोहोच तो मिळालेल्या दिनांकासह देण्यात यावी.

—x स्वाक्षरीत x—
सह संचालक,
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे**

क्रमांक – स्था/ब–१/नपलेप/सातारा/२००१०–२०११/५१०     दिनांक ११/०६/२०१२

प्रत सादर :-

१. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, नगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
५. वरिष्ठ लेखाधिकारी, बाह्य लेखा परीक्षण विभाग क्र.४, मुंबई.
६. आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे.
७. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

प्रत अग्रेषित

१. सहायक संचालक स्थानिक लेखा परीक्षा, सातारा.
२. अभिलेखापाल, पुणे विभागीय कार्यालय, पुणे.

सह संचालक,
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे**